


म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. नं. ९८७
९१५५३

REFBK-0007883

# आपलें पुणें

५८८३

लेखक :

रा. त्रि. दामले, साहित्यप्राज्ञ, बी. कॉम्.
वि. न. गोंधळेकर, एस्. टी. सी. पुणें

संग्रहालय
सं. नं.
स्थळ प्रत

प्रस्तावना-लेखक :

महामहोपाध्याय द. वा. पोतदार

REFBK-0007883
REFBK-0007883

नेलेंकर प्रकाशन

सन १९५२ ] प्रथमावृत्ति [ मूल्य १ रुपया

# ऋण-निर्देश

आमचे शिष्यमित्र, भ. धों. परांडकर, कमर्शिअल् आर्टि यांनी फारच अल्प मोबदल्यांत आंतील कांहीं चित्रें व सुंदर मु… पृष्ठ काढून दिल्याबद्दल व अंथपासून इतिपर्यंत पुस्तकाची सजावट करून देण्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

प्रकाशक—बा. म. नेलेंकर, बी. ए. बुधवार चौक, पुणें २
मुद्रक—स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्एल्. बी. नवीन समर्थ विद्यालयाचा
'समर्थ भारत' छापखाना, ४१ बुधवार पेठ, पुणें २

# अर्पण पत्रिका



पुणें कॉर्पोरेशनचे पहिले
नगराध्यक्ष ( मेयॉर )
**श्री. बाबुराव सणस**
यांस सादर समर्पण

# आपलें पुणें

श्री. वि. न. गोंधळेकर यांनीं मुलांसाठीं आजवर जीं अनेक छोटीं छोटीं परंतु उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, त्यांत या 'आपलें पुणें' नामक पुस्तकानें चांगलीच भर पडेल यांत शंका नाहीं.

पुण्यासारख्या शहरांत राहणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनीं पुण्याची जेवढी बारकाईनें ओळख करून घ्यावी तेवढी थोडीच ठरणार आहे. आपलें गांव सारेच पाहतात, कारण ते त्यांतच राहात असतात. पण डोळसपणानें पाहात असतील असें मात्र अनुभवास येत नाहीं.

डोळे उघडे ठेवून एखादा गांव पहाणें यांत फारच मोठें शिक्षण मिळण्यासारखें आहे. दाखविणारा शहाणा माहितगार मात्र असावा. अशाच्या संगतींत गांव पहाणारा थोड्या वेळांत चांगलाच बहुश्रुत बनून जाईल यांत कसलीहि अतिशयोक्ति नाहीं. जुन्या मराठ-शाहीचें एके काळचें मोठमोठ्या घडामोडींचें हें शहर म्हणजे एक सर्वाढ्य केंद्रच होतें यांत शंका नाहीं. त्यानंतरच्या ब्रिटिश पारतंत्र्याच्या काळींहि या शहरानें पुनः आपलें बुडालेलें डोकें वर काढलें आणि आज तर भारतांतील एक अत्यंत विख्यात स्थान म्हणून वाढती प्रशंसाच त्यास लाभत आहे. वस्ती वाढली, दळणवळण खूपच वाढलें, त्यायोगें स्वतंत्र भारतांतील त्याचा विस्तार वाढून स्थानिक कारभारी संस्थेलाहि महापालिकेचें विशाल रूप प्राप्त

झालें. जों जों दळणवळणाचीं साधनें, आहेत याहूनहि वाढतील त्यावेळीं मुंबई-पुणें या दोन महाराष्ट्रीय नगरांची वाढ आजच्याहून आणखी विलक्षणच होईल.

आतांच वेधशाळा आणि राष्ट्रीय रसायनशाळा या दोन भव्य आणि महत्त्वाच्या संस्था मध्यवर्ति सरकार पुण्यास चालवीत आहे. लवकरच राष्ट्रीय संरक्षण विद्यालय पुण्याच्या परिसरांत सिंहगडच्या पायथ्याशीं जेव्हां चालू होईल, आणि पेनसिलीन या दिव्य औषधीचा कारखाना चिंचवडाजवळ उभा राहील तेव्हां पुण्याचें आजचें रूप याहूनहि विशाल होऊन त्याची मातब्बरी किती तरी पटीनें वाढेल !

अशा शहरांत राहून विद्या करणाऱ्यांना फारच तरतरीतपणा आणि चौरसपणा अंगीं बाळगावा लागेल. आपल्याच गांवाशहराची धड माहिती ज्यांस नाहीं त्यांची अशा कामीं कशी धडगत लागेल तें काय सांगावयास पाहिजे ? एवढयासाठींच अगदीं लहान वयापासूनच मुलांना चौरस ज्ञान दिलें पाहिजे. त्यांस सर्व दाखविलें समजाविलें पाहिजे. श्री. गोंधळेकरांसारख्यांचे प्रयत्न याच कारणासाठीं उपकारक वाटतात. म्हणून श्री. गोंधळेकर यांच्या या प्रयत्नाचें सर्वांनीं सप्रेम स्वागत करावें.

लोक कल्याण,<br>
आश्विन वद्य ४<br>
६।१०।५२, पुणें.

**दत्तो वामन पोतदार**

# लेखकांचें हद्गत

प्राथमिक शाळांतील इयत्ता १ ते ४ मध्यें स्थानिक भूगोल व इतिहास शिकवितांना प्रथम लहान मुलें मुली ज्या गांवांत राहतात त्या गांवाचा अभ्यास प्रथम करावा व नंतर जिल्ह्याचा अभ्यास करावा या मानसशास्त्राच्या नियमास अनुसरून आम्ही असें सुचवितों कीं हें पुस्तक इयत्ता २ ते ४ मधील मुलांमुलींना पाठ्य पुस्तक अगर पुरवणी वाचन पुस्तक म्हणून नेमावें.

सदर पुस्तकास माझे बालपणचे गुरुजी म. म. दत्तोपंत पोतदार यांनीं प्रस्तावना लिहून मला उपकृत केलें आहे याबद्दल त्यांस धन्यवाद ! त्यांच्या इतका 'माझें पुणें' या पुस्तकावर अधिकार वाणीनें व चिकित्सक बुद्धीनें लिहूं शकणारा दुसरा कोणता धिकारी पुरुष असणार ?

# विषय-सूचि


| पाठाचा अनुक्रमांक | पाठाचा विषय | पाठाचें पृष्ठ |
|---|---|---|
| १ | ओळख … … … … | १ |
| २ | पुण्याच्या आवती-भोवतीं … … … | ४ |
| ३ | पुण्यांतील रस्ते आणि वाहतूक … … | ६ |
| ४ | शहराची पाहणी … … … | १० |
| ५ | शहराची पाहणी ( चालू )… … … | १४ |
| ६ | पुण्याची पाहणी ( पुढें चालू ) … … | १७ |
| ७ | पुण्याची पाहणी ( पुढें चालू ) … … | २० |
| ८ | नवें पुणें … … … … | २३ |
| ९ | लष्करांतून फेरफटका … … … | २६ |
| १० | पुण्यानजीक सहलीस योग्य ठिकाणें कोणतीं ? | ३० |
| ११ | विद्येचें माहेरघर… … … … | ३२ |
| १२ | पुण्यांतील संस्था … … … | ३८ |
| १३ | पुण्यांत कोठें काय मिळतें ? … … | ४४ |
| १४ | कोठें काय मिळतें ? … … … | ४७ |
| १५ | पुण्यांतले कांहीं व्यवसायी … … … | ५१ |
| १६ | विविध माहिती … … … … | ५४ |
| १७ | पुण्यांतील कांहीं नाणावलेल्या व्यक्ति … … | ५७ |
| १८ | पुण्यांतील लोक… … … … | ६५ |
| १८ | लोक-शिक्षण … … … … | ६७ |

| | | |
|---|---|---|
| १९ | " चला लोकहो, शहर पहा " ... ... | ६८ |
| २० | कॉर्पोरेशनचें दोन वर्षांतलें कार्य ... ... | ७१ |
| २१ | आणखी काय करणार बुवा ? ... ... | ७४ |
| २२ | कॉर्पोरेशनच्या सार्वजनिक निवडणुका ... ... | ७६ |
| २३ | कॉर्पोरेशनच्या सभा ... ... ... | ७९ |
| २४ | विविध माहिती ... ... ... ... | ८४ |
| २५ | पुरवणी माहिती ... ... ... ... | ८७ |




श्री. स. गो. बर्वे, आय. सी. एस.
पुणें कॉर्पोरेशनचे पहिले
कमिशनर

# आपलें पुणें

## पाठ पहिला

## ओळख



मुलांनों, तुम्ही पुणें शहरांत राहतां. येथील शाळांमधून अभ्यास करतां आणि सायंकाळीं क्रीडांगणावर खेळतां. रस्त्यानें जातांना तुम्हीं दुकानांच्या पाट्या वाचतां. पण त्याबद्दल कधीं चौकशी करतां काय ? विद्यार्थ्यानें चौकस असावयास पाहिजे, खरें ना ? या पुण्याची खरी ओळख आहे का तुम्हांला ? निदान तोंडओळख ! चला आपण त्या मैदानांत बसूं. तेथें तुम्हांला पुण्याची हकीकत मी सांगावयाचें ठरविलें आहे.

आजचें पुणें केवढें मोठें आणि गजबजलेलें दिसतें ! पण पूर्वी शरच लहान होतें बरें का ! आपले शिवाजी महाराज लहानपणीं येथें राहत असत. त्या वेळीं हें एक छोटेसें शहर होतें. आजूबाजूला जंगलें होतीं. जिजामाता बाग आहे ना, तेथें ते राहात असत. (१६४२) शाहिस्तेखानाचीं बोटें महाराजांनीं याच वाड्यांत छाटलीं! दादाजी कोंडदेव याची व्यवस्था पाहत असत. महाराजांनीं स्वराज्य स्थापलें. शाहूमहाराजांचे तडफदार शूर पेशवे बाजीराव यांनीं आपली राजधानी मागून पुण्यास आणली. भव्य शनिवारवाडा बांधला. एकामागून एक पेशवे कर्तबगार निघाले. शूरांची भूमि म्हणून पुण्याचें महत्त्व वाढत गेलें. कसबा, नारायण, शनिवार, बुधवार, भवानी, रास्ता यांसारख्या पेठा वाढत गेल्या. राजधानीमुळें अनेक कारागीर, व्यापारी, विद्वान यांनीं पुण्याला आसन ठोकलें. बुधवारवाडा, पर्वती, विश्रामबाग वाडा, यांसारख्या प्रेक्षणीय इमारती येथें झाल्या.

१८१८ सालापासून स्वराज्य गेलें. पारतंत्र्य आलें ! इंग्रजी राजवट सुरू झाली ! पुण्यांत बदल झाला. इंग्रजी शिक्षण सुरू झालें ! तरी देखील स्वराज्याची तळमळ लोकांना होती ! 'स्वराज्य' चळवळींचा जन्म पुण्यांत झाला हें विसरूं नका ! लोकमान्य टिळक यांनींच लोकांना स्वराज्याचा गुरुमंत्र दिला. समाज सुधारण्याची चळवळ करणारे आगरकर, निबंधमालेनें लोकांना जागविणारे चिपळूणकर, न्यायमूर्ती रानडे, ज्योतिबा फुले, लोकहितवादी, चाफेकर बंधू, तात्यासाहेब केळकर यांच्यामुळें आधुनिक काळांतहि पुण्यानें आपलें नांव राखलें ! पुणें हें शिक्षणाचें हल्लीं माहेरघर आहे. येथें सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय आहे ! पुण्याचें स्वतःचें विद्यापीठ देखील आहे ! रेल्वेचें जंक्शन आहे ! त्यामुळें तें वाहातु-

नों. क्र.

कीचें केंद्र बनलें आहे. भारत सरकारचें लष्करी केंद्र म्हणून देखील पुण्याचें स्थान अलौकिक आहे. व्यापार, शिक्षण, उद्योगधंदे यांची गेल्या पन्नास वर्षांत झपाट्यानें वाढ झाली आहे. पुण्याची लोकसंख्या सुमारें ५॥ लाखांवर आहे. त्यामुळें या ठिकाणीं कार्पोरेशन झालेलें आहे. कार्पोरेशनला लाभलेले माजी कमिशनर श्री. सदाशिवराव बर्वे हे मोठे उत्साही व कर्तबगार असल्यानें दोन वर्षांतच त्यांनीं पुण्याचें स्वरूप पालटवून टाकिलें व पुणें हें आदर्श शहर बनविण्यासाठीं ते सतत खटपट करीत होते. त्यांच्या ह्या कार्यानें नागरिकांत ते फारच लोकप्रिय झाले होते.

पुण्याचा इतिहास शूर, विद्वान् आणि कर्तबगार लोकांनीं भरलेला आहे. भारताचें स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठीं लागणाऱ्या कर्तबगार लोकांचा भरणा पुण्यांतून देखील सारखा होत राहिला पाहिजे. ही जबाबदारी तुमच्यावर आहे बरं का ! तुमच्यांतूनच भावी पिढींत मोठमोठे लोक निर्माण होतील ! आपल्या शहराची सर्वांगीण माहिती तुम्हांला असावयास पाहिजे ! असे पुष्कळ विद्यार्थी आमच्या पाहण्यांत आहेत कीं अमेरिकेंत व इंग्लंडांत काय होतें याची त्यांना माहिती आहे, पण पुण्यांत काय आहे याचा त्यांना गंध नाहीं ! हें बरें नव्हे. इतर ज्ञानाबरोबर पुण्याचीहि माहिती जरूर लक्षांत ठेवा ! अशा बाबतींत तुमचें अज्ञान दिसावयास नको.

### प्रश्न

(१) शिवाजी महाराजांच्या वेळीं पुणें शहर कसें होतें ? तें आज कसें आहे ?
(२) स्वराज्याच्या चळवळीचा उगम कोठें झाला ?
(३) पुणें कशासाठीं प्रसिद्ध आहे ?
(४) "पुण्याचा इतिहास शूर, विद्वान् व कर्तबगार लोकांनीं भरलेला आहे" स्पष्ट करा.
(५) अर्थ द्या. तडफदार, प्रेक्षणीय, जंक्शन, भावी, गंध नसणें.

## पाठ २ रा

# पुण्याच्या आवतीं-भोवतीं

आपण देशाचा भूगोल शिकतों तेव्हां त्याच्या सीमा कोणच्या याचा आपणास अभ्यास करावा लागतो. पुणें शहराच्या सीमा देखील आपणास माहिती पाहिजेत, खरें ना ?

आपल्या पुण्याच्या पश्चिमेकडे पहा. डोंगरच डोंगर दिसतात. पश्चिमेकडे सुमारें तीस मैलांपर्यंतचा प्रदेश डोंगराळ व दऱ्याखोऱ्यांनीं भरलेला आहे. दक्षिणेकडे पाहिलेंत तर काय आढळेल ? दक्षिणचा भाग खडकाळ आहे. मोठमोठे पाट आहेत. मोठाले पाट लहान लहान टेकड्यांनीं जोडलेले आहेत. पूर्वेकडील आणि उत्तरेकडील भाग मात्र सपाट आणि सुपीक आहे.

पुण्याच्या दक्षिणेस आपली पर्वतीची टेकडी आहे. तिला लागूनच पुढें कात्रज घाटाचे लहान लहान फाटे आहेत. शिवाजी महाराजांनीं बैलांच्या शिंगांना मशाली बांधून खानाची फजीति केली ती याच घाटांत बरें का ? शहराच्या पश्चिमेस हनुमान टेकडी, चतु:शृंगी आणि लॉ कॉलेजची टेकडी आहे. शहराच्या पूर्वेस पुण्याचें स्टेशन आहे. जी. आय. पी. व एम्. एस्. एम्. रेल्वे यांचें हें जंक्शन आहे.

एम. एस्. एम्. रेल्वे दक्षिण महाराष्ट्रांत मिरजेपर्यंत जाते आणि जी. आय. पी. रेल्वेचा एक फांटा रायचूरपर्यंत जातो. दुसरा मुंबईस जातो.

पुण्याला आपण पाणी कशाचें पितों ? नळाचें. हें पाणी आपणास मुठा नदीपासून मिळतें. खडकवासल्याजवळ धरण बांधलें आहे. तेथून आपणास पाणी मिळतें. खडकवासला हें ठिकाण सहल

काढण्यास उत्तम आहे. हें पाणी सातारारोडवरील खडकावर सांठविलें आहे. तेथून तें शुद्ध करून आपणास मिळतें. कात्रजच्या तलावांतून देखील पाणी आपणास मिळतें. हा तलाव पेशवेकालीन आहे. दोन्ही तलावांची व्यवस्था पुणें कार्पोरेशनकडे आहे.

पुणें शहराची लांबी पूर्वपश्चिम म्हणजेच घोरपडी ते लॉ कॉलेज ५॥ मैल आहे. दक्षिणोत्तर म्हणजे पर्वती ते खडकी सुमारें ४॥ मैल आहे.

पुणें शहर देशावर समुद्रसपाटीपासून १८०० फुटांवर आहे. यामुळें पुण्याची सर्वसाधारण हवा कोरडी आहे. पुण्यांतील रात्री उन्हाळ्यांत सुखकारक असतात! एप्रिल-मेच्या सुमारास पुण्यांत वळवाचा पाऊस पडतो. जून ते आक्टोबरपर्यंत मान्सूनचा पाऊस पडतो. दर वर्षीचा सरासरी पाऊस ३० इंच. १८९२ सालीं मात्र ५० इंच ९१ सेंट पाऊस पडला! २४ तासांत जास्तींत जास्त पाऊस ५ इंच ७६ सेंट त्याच वर्षी पडला!! खूप पाऊस पडला कीं पुण्याच्या मुळामुठा नदीला मोठा पूर येतो. ओंकारेश्वरचा नंदी बुडालेला पाहण्याचा सोहळा लोक कौतुकानें पाहतात! मुळा नदी पुणें शहरांत पश्चिमेकडून प्रवेश करते व मुठा नदी नैऋत्येकडून प्रवेश करते. या दोन नद्यांचा संगम शहरापासून थोड्याच अंतरावर होतो! हें ठिकाण पहाण्यासारखें आहे. नदीला पूर आला कीं लकडीपुलावरून नदींत उडी मारावयाची व पोहत ओंकारेश्वराला जावयाचें असा पुण्यांतील हौशी लोकांचा कार्यक्रम असतो.

### प्रश्न

(१) पुणें शहराच्या सीमा सांगा.


(२) शब्द भरा.

पुण्याला पाणी—नदीपासून मिळतें. — येथें—आहे. — हें ठिकाण सहल करण्यास—आहे. पुणें शहर समुद्रसपाटीपासून—फुटांवर आहे.

(३) " मुळा-मुठा नदीचा पूर " यावर १५ ओळी लिहा.

## पाठ ३ रा

# पुण्यांतील रस्ते आणि वाहतूक



पुणें शहर हें जुन्या आणि नव्या पद्धतीचें मिश्रण आहे. डेक्कन जिमखाना, पुरंदरे कॉलनी, टिळक रोड, शिवाजी नगर व लष्कर हे भाग नवीन वसलेले आहेत. त्यामुळें येथील घरेंही नवीन पद्धतीचीं व आटोपशीर आहेत आणि रस्ते देखील रुंद व आखीव आहेत. कसबा, भवानी, रास्ता, सोमवार, सदाशिव या पेठा जुन्या आहेत. तेथील घरें जुन्या पद्धतीचीं असून रस्ते अरुंद आणि वेडे-वांकडे आहेत. अलीकडे म्युनिसिपालिटीनें सुधारणा केली असली तरी देखील पुष्कळच बोळ आपणास दिसून येतील.

कॉर्पोरेशन झाल्यापासून रस्त्यांची सुधारणा झपाट्यानें होत आहे. बहुतेक रस्ते डांबरी केलेले आहेत. लष्करांतील मेनस्ट्रीट

आणि पुष्कळसे रस्ते, साचापीरस्ट्रीट, शहरांतील लक्ष्मीरोड, टिळक रोड, जंगली महाराज रोड, मुंबई-पुणें रस्ता, सातारा रोड, सोलापूर रोड हे रस्ते मोठाले आणि रहदारीनें गजबजलेले आहेत. या रस्त्यानें फिरतांना समाधान वाटतें !

मुंबई शहरांत ट्रामगाडया आहेत. ही सोय पुण्यांत नाहीं ! पण त्याची उणीव कोणीं भरून काढली आहे? सायकलींनीं ! ! सायकलीं-बद्दल पुणें प्रसिद्ध आहे. दर घरीं एक तरी सायकल आहेच ! या सायकलीबद्दल कॉर्पोरेशननें दरसाल दोन रुपये सायकल-कर ठेवला आहे. सुमारें दोन लक्ष रुपये कराचें उत्पन्न मिळतें. रस्ते दुरुस्ती-साठीं या उत्पन्नाचा उपयोग होतो. पुण्यांतील सायकलवाला मोठ्या कुशलतेनें सायकल चालवितो ! लहान लहान मुलें व मुलीदेखील सायकल चालवितात ! सायकल चालविण्याचें जणुं बाळकडूच त्यांना मिळालेलें असतें ! ! तुम्हाला सायकल चालवतां येते का? नसेल तर जरूर शिका हं ! एक आणा तास भाडयानें सायकली देऊन पोट भरणारे छोटे छोटे दुकानदार पुण्याच्या चौकाचौकांत आहेत !

पुण्यांतील दुसरीं वाहनें म्हणजे टांगे, ऑटोरिक्शा आणि भाडयाच्या टॅक्सी. बुधवार चौकांतून पुणें स्टेशनवर जावयाचें झालें तर टांगाभाडें सुमारे १ रुपया पडतें. टॅक्सीला २॥ रुपये पडतात व रिक्शा १२ आण्यांत नेते ! खेडेगांवांतून भाजीपाला व इतर माल आणणाऱ्या मोटार लॉऱ्या आणि बैलगाडया आहेत. तरी देखील जनतेच्या सोयीची वाहतूक म्हणजे कॉर्पोरेशनच्या **बसेस्.** या बसेस्मुळें नागरिकांची फारच सोय झाली आहे. तुम्ही अनेक-वेळां या बसेस्मधून गेलां असाल? पण कोणती बस कोठें जाते आहे का ठाऊक? पहा बरें ! पाहुणे आले कीं तुमची मग फजिती होईल. आतांच लक्षांत ठेवा पाहूं !

**रस्ता नं. १**

स्वारगेट मोटार स्टँड ते सरळ शिवाजी रस्त्यानें खा. ब. पेस्तनजी दवाखाना, रामेश्वर देऊळ, ग्लोब थिएटर, बुधवार चौक, शनवार वाडा, नव्यापुलावरून शिवाजीनगर, रेल्वेस्टेशन या रस्त्याची लांबी २·८ मैल.

**रस्ता नं. १ ए.**

स्वारगेटावरून नवापूल, वेधशाळा, सिव्हिल कोर्ट ससून हॉस्पिटल, पुणें स्टेशन. लांबी ४·५ मैल.

**रस्ता नं. २**

डे. जिमखाना टॉकीज् ते सरळ लक्ष्मीरोडनें गोखले हॉल, सेवासदन, सोन्यामारुतीवरून दारुवाला पूल, रास्तावाडा, नरपतगीर गेट, बोळाई चौकांतून मेनरोडनें पुणें स्टेशन. लांबी ३·३

दुसरा एक फाटा लकडीपुलाच्या डाव्या हातानें नारायण पेठेंतून जाऊन प्रभात टॉकीज, बुधवार चौक, वसंत टॉकीज, कसबागणपती या मार्गें फडके हौदावरून स्टेशनवर जातो.

**रस्ता नं. ३**

पूनास्टेशनवरून, सेंट्रल ऑफिसीस्, सिव्हिलकोर्ट, ऑबझरवेटरी, जंगलीमहाराज रोड, डेक्कन जिमखाना, टिळक रोडनें स्वार गेट. लांबी ५·३ मैल.

**रस्ता नं. ६**

पूना स्टेशनवरून जी. पी. ओ., महात्मा गांधी रोड, भवानी पेठ, कस्तुरी चौक, फुले मार्केट, विश्रामबागवाडा व तेथून डेक्कन जिमखाना. लांबी ४·७ मैल.

**रस्ता नं. ७**

पुणें स्टेशन ते महात्मा गांधी रोड, कँपमधून साचापीर स्ट्रीट, क्वार्टरगेट, डुल्या मारुती, सोन्या मारुती, सिटी पोस्ट, सेवासदन, गोखले हॉलवरून डेक्कन जिमखाना. लांबी ४ मैल आहे.

**रस्ता नं. ९**

पुना स्टेशन ते बंडगार्डनवरून सॅपर्स अँड मायनर्सवरून होळकर पूल. लांबी ३·३ मैल.

**रस्ता नं. १०**

ईस्ट स्ट्रीटच्या कोपऱ्यावरून घोरपडी बाजार, पुढें इलियट लाइन्स. लांबी २ मैल.

**रस्ता नं. ११**

पूल गेटावरून रेसकोस मार्गें हडपसर. लांबी ४·१ मैल. याशिवाय **हिंगणें** येथें जाणारी बस डेक्कन जिमखान्यावरून सुटतें. **औंधला** जाणारी बस नव्या पुलाखालील स्टँडवरून सुटते! **वानवडीस** शिवाच्या छत्रीला जाणारी बस लष्करांतून सुटते! पुणे स्टेशनवरून सुटणाऱ्या आगगाड्यांचें वेळापत्रक आपणास रेल्वे गाईडमध्यें पाहावयास मिळतें. पुण्यापासून लोणावळ्यापर्यंत लोकल गाड्यांची सोय आहे. खडकी, देहूरोड व तळेगांव या ठिकाणीं नोकरीस जाणाऱ्यांना या लोकलगाड्यांचा उपयोग होतो. नागरिकांना तिकिटें लवकर मिळावीं म्हणून बुधवारांत रेल्वेचें तिकिट ऑफिस आहे. येथें काढलेलीं तिकिटें दोन दिवस चालतात!

**प्रश्न**


(१) पुण्यांतील नव्या पेठा कोणत्या?
(२) पूर्वीच्या जुन्या पेठा कोणत्या आहेत?
(३) ट्रामगाड्यांची उणीव कशानें भरून काढली आहे? कशी?
(४) "पुण्यांतील सायकली" वर १५ ओळी निबंध लिहा.

## पाठ ४ था

# शहराची पाहणी

मुलांनो, या आठवडयांत आपणास शहराच्या निरनिराळ्या पेठांतून फिरावयाचें आहे ! आपण नीट पाहणी करूं ! मुख्य गोष्टी कागदावर टिपून ठेवण्यास विसरूं नका बरें का !

आजचा शनिवारचा दिवस ! शाळेला सुट्टी आहे. आपण आधीं शनवार पेठेंतच जाऊं या. शनवार पेठ हें पुण्याचें एके काळीं नाक होतें. कां बरें ? आपले पेशवे या पेठेंतील शनिवार वाडयांत राहात असत.




हा पहा भव्य तटबंदीचा शनिवारवाडा ! श्रीमंत बाजीराव पेशवे

यांनीं १७३० सालीं १६ हजार रुपये खर्चून हा बांधला! या जागेंत 'कुत्र्याच्या पाठीस ससा लागला होता' हें पाहून बाजीरावांनीं ही जागा निवडली! दिल्लीवर चाल करावयाची म्हणून मुख्य दरवाजाला नांव काय दिलें? दिल्ली दरवाजा! तटाला सभोंवती दरवाजे दिसत आहेत. गणेशदरवाजा, मस्तानी दरवाजा, खिडकी दरवाजा, जांभूळ दरवाजा असे दरवाजे आहेत. तटाचे बुरुज मोजा पाहूं! किती आहेत एकूण? १९. आंतलें हें आवार ५ एकर भरेल! आपल्याला पडके अवशेष दिसत आहेत! पण इतिहास जिवंत आहे आणि तो स्फूर्ति देत आहे, म्हणूनच या जागेचें महत्त्व! पूर्वीं येथें सहा मजली इमारत होती. हजारी कारंजें होतें. आंतील अष्टकोनी विहीर पाहण्यासारखी आहे. बांधणी पहा कशी भक्कम आहे. या शनिवार वाड्यासमोर जमलेल्या पटांगणांतील महाराष्ट्रीय सैनिकांनीं एके काळीं सर्व भारत हलवून सोडला! तसे पराक्रमी होण्याचा प्रयत्न करा. आणखी काय काय पाहिलें?

**अमृतेश्वराचें देऊळ** आणि ओंकारेश्वराचें देऊळ:—हीं दोन्हीं नदीकांठीं आहेत. ओंकारेश्वराजवळच स्मशान आहे.

**पांजरपोळ**—या ठिकाणीं निराश्रित लुळीं, पांगळीं, अनाथ जनावरें व पशुपक्षी येथें पाळण्यांत येतात.

शनिवार पेठेस मुसलमानी अमलांत मुर्तुजाबाद हें नांव होतें. पुढें श्रीमंत बाजीराव पेशव्यांनीं त्यास शनिवार पेठ असें नांव दिलें.

कसबा पेठ म्हणजे पुण्याची सर्वांत जुनी पेठ. दाटीवाटीनें लागलेलीं घरें आणि बोळ हें या पेठेंतलें वैशिष्ट्य! येथील **गणपतीचें**

देऊळ म्हणजे पुण्याची ग्रामदेवता ! लग्नमुंजीच्या कार्यांत पहिली सुपारी कसबा गणपतीला जाते ! वराती व भिक्षावळी तुम्ही नेहमीं हौसेनें पाहतां. या वराती व भिक्षावळी कसबा गणपतीला नेऊन आणण्याची चाल आहे. शिवाजी महाराजांची आई जिजाबाई हिनें हें देवालय बांधलें. दीपनैवेद्याकरितां त्यांनीं ७५ रुपये दरवर्षी नेमून दिले होते ते आजहि चालू आहेत. ह्या गणपतीस पूर्वी फणीआळीचा गणपती म्हणत. हस्तीदंत फण्या, कंगवे, फांसे पूर्वी येथें उत्तम करीत असत !

**अंबरखाना**—शहाजीराजांनीं हा बांधला. यांतील राजमहाल नांवाच्या वाड्यांत शिवाजी महाराज लहानपणीं राहात असत. शाहिस्तेखानाची फटफजिती येथेंच झाली !

**जिजामाता बाग**—पडकीं घरें पाडून या ठिकाणीं बाग बनविलेली आहे ! लहानपणीं तुम्हीं येथें खेळावयास गेला होतां काय ? स्त्रिया व मुलें यांना हवा खाण्यासाठीं हा बाग आहे.

**शेखमल्लयाचा दर्गा**—नदीकांठीं हा दर्गा आहे. धाकटा व मोठा असे दोन दर्गे आहेत. औरंगजेबाचा नातु मोहिलुल मुलुक याचें सर्वांत मोठें थडगें आहे !

**रविवार पेठेंत**—आपणास काय बरें दिसलें ? व्यापारानें पेठ गजबजली आहे, खरें ना ? मोती चौकांत सराफ आळी आहे. सोनें, चांदी, जवाहीर व डागडागिन्यांचीं दुकानें येथें आहेत. मोठमोठया पेढयाहि आहेत. धरमकाटा आहे. तेथें दोन पैशांत सोनें-चांदीचें वजन करून मिळतें. तांब्या-पितळेचीं, लोखंडी सामानाचीं दुकानें आहेत. सर्व प्रकारच्या घाऊक विक्रीचीं व सर्व प्रकारच्या जिनसांचीं दुकानें या पेठेंत आहेत.

सं. भू.प्र. १८७

सरदार नातू यांनीं बांधलेलें **सोमेश्वराचें** देऊळ प्रेक्षणीय आहे. देवळाच्या आजूबाजूस कापडाचा व्यापार चालतो.

पुण्यांतील सर्वांत मोठी जुम्मामशीद येथें आहे. आंत सुंदर कारंजें, हौद व मोठा दिवाणखाना आहे.

वल्लभसांप्रदायी लोकांचें **विठ्ठलमंदिर** दारुवाला पुलाजवळ आहे. बोहरी लोकांची वस्ती या भागांत आहे. धर्मगुरूकरितां यांनीं बांधलेली टोलेजंग इमारत आहे. त्यास **जमातखाना** म्हणतात. धर्मगुरु आले कीं उत्तम रोषणाई करतात.

## प्रश्न

(१) टीपा लिहा :

शनिवारवाडा, अंबरखाना, पांजरपोळ.

(२) " पुण्यांतील मंदिरें " यावर १० ओळी लिहा.

(३) पुण्यांतील प्रसिद्ध देऊळ व मशीद कोणती ?

(४) जमातखाना म्हणजे काय ?

## पाठ ५ वा

# शहराची पाहणी (चालू)

आज आपण सदाशिव पेठेंत जात आहोंत. सदाशिवराव भाऊंनीं ही पेठ वसविली.

हेंच तें सुप्रसिद्ध **खुन्या मुरलीधराचें देऊळ!** देवाची मूर्ति किती नाजूक आणि सुंदर आहे ! नाना फडणीसांना ही मूर्ति बेलबागेंत बसविण्यासाठीं पाहिजे होती. पण गद्रे यांनीं ती दिली नाहीं. नाना फडणिसांचे घोडेस्वार व गद्रे यांचे लोक यांच्यांत चकमक झाली व खून पडले ! तेव्हांपासून या देवाला खुन्या मुरलीधर म्हणतात.

**नरसोबाचें मंदिर**हि जवळच आहे. मंदिर विस्तीर्ण आहे. नरसोबाचे भक्त येथें नियमानें दर्शनास येत असतात.

**शिवाजी मंदिर**—हें सभा व कार्यक्रमांचें या भागांतील एक ठिकाण आहे. येथील गणपति-उत्सव देखील थाटानें साजरा होतो. महाराजांची मूर्ति तेजस्वी आहे.


**भिकारदास मारुतीनें** पुण्यांतील मारुतींमध्यें अग्रस्थान मिळविलें आहे. दूरदूरच्या पेठांतून नियमानें दर्शनास येणारे लोक पुण्यांत आहेत.

**विश्रामबाग वाडा**—पुणें शहराची कॉर्पोरेशनची कचेरी येथें आहे. हा वाडा अति भव्य व प्रेक्षणीय आहे. दुसरे बाजीराव यांनीं २ लक्ष रुपये खर्चून हा वाडा बांधला ! वाड्यास जोडून एक बाग होता. त्याच्यावर विश्राम नांवाचा माळी काम करीत असे, म्हणून यास विश्रामबाग वाडा म्हणतात अशी आख्यायिका आहे.

**टिळक मंदिर**—हें मोठमोठ्या सभांचें ठिकाण आहे. उन्हाळ्यांतील वसंत व्याख्यानमाला येथेंच चालते.

**भारत इतिहास संशोधन मंडळ**—यांत इतिहास संशोधनाचें कार्य चालतें. जुनीं कागदपत्रें येथें आहेत.

**गोखले स्मारक मंदिर**—हें लक्ष्मीरोडवर असून तेथें वरच्या मजल्यावर मुक्तद्वार नांवाचें ग्रंथालय आहे. मोफत वाचनाची सोय आहे.




**पर्वती**—पर्वती हें पुण्यांतील एक प्रेक्षणीय व रम्य स्थान आहे. श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनीं टेकडीवर हें स्थान वसविलें. पूर्वी या टेकडीवर देवीचें स्थान होतें. महादेव, विष्णु, कार्तिकेय, विठ्ठलरखुमाई यांचीं देवळें व पेशव्यांची समाधि येथें आहे. पहांटे उठून पर्वती चढून जाणें हा पुण्यांतील पुष्कळ लोकांचा नियम आहे.



नारायणराव पेशव्यांनीं वसविलेल्या नारायण पेठेंतील **गायकवाड वाडा** हा प्रसिद्ध आहे. लोकमान्य टिळकांनीं हा बडोद्याचे श्रीमंत गायकवाड सरकार यांजपासून विकत घेतला. गणपती उत्सवांत येथें मोठा थाट असतो. गणपती-विसर्जनाच्या मिरवणुकींत गायकवाड वाड्याचा गणपती अग्रस्थानीं असतो. केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें येथून निघतात. या वाड्यांत टिळकांचा पुतळा व अनेक तैलचित्रें पाहण्यासारखीं आहेत.

**लकडी पूल**—नानासाहेब पेशव्यांनीं १७६१ सालीं बांधला होता. तो लांकडाचा होता म्हणून त्यास लकडीपूल म्हणत असत. १८४० सालीं पुरानें पूल वाहून गेला तेव्हां इंग्रज सरकारनें दगडी पूल बांधला. हल्लीं या पुलावर रहदारी फार वाढल्यानें पूल मोठा करण्यासाठीं पुलाचें बांधकाम चालू आहे; तें पुरें झाल्यावर पूल मोठा विस्तीर्ण व रुंद होईल. या पुलाजवळच स्मशान आहे.

खाजगीवाल्यांनीं वसविलेल्या **गणेश पेठेंत** काय दिसलें? डुल्या मारुती आणि दगडी नागोबा.

१७६१ सालीं पानपतवर मराठ्यांचा पराभव झाला आणि इकडे त्याच सुमारास मारुती डोलूं लागला ! म्हणून त्यास डुल्या मारुती म्हणतात. दगडी नागोबाची यात्रा नागपंचमीस भरते व मोठी गर्दी असते.

### प्रश्न

(१) खुन्या मुरलीधर कां म्हणतात ?
(२) नरसिंह अवताराची गोष्ट वाचा व थोडक्यांत लिहा.
(३) टीपा लिहा.
शिवाजी मंदिर, भारत इतिहास संशोधक मंडळ, पर्वती.
(४) 'लकडी पूल' म्हणजे काय ? आता तसा पूल आहे काय ?
(५) 'डुल्या मारुती' कां म्हणतात ?

---

## पाठ ६ वा

# पुण्याची पाहणी (पुढें चालू)

**नानाच्या** पेठेंत चला. नाना फडणिसांनीं ही पेठ वसविली. मारवाडी, गुजराथी व कामकरी लोकांची वस्ती या पेठेंत दिसत आहे. बैलगाडयांचे तळ पहा किती आहेत ते ! बैलगाडया उभ्या करण्यासाठीं मालक भुईभाडें घेतात बरें का ! ही पेठ लष्कराला लागूनच आहे. बिगारी लोक येथें राहतात आणि लष्करांत कामाला जातात.

या पेठेंत प्रसिद्ध ठिकाणें कोणतीं ?

निवडुंग्या विठोबा, घोडेपीर व अग्यारी.

**निवडुंग्या विठोबा**—याची मूर्ति निवडुंगाच्या जंगलांत सांपडली. पुरुषोत्तम गुजराती यांनीं तीस हजार रुपये खर्चून १८३० सालीं भव्य देऊळ बांधलें व देवास सालिना ५०० रुपयांचें उत्पन्न करून दिलें. आळंदीहून येणारी ज्ञानोबाची पालखी येथें मुक्कामाला असते. त्या वेळीं 'ग्यानबा तुकारामाच्या' दर्शनास भाविकांची रीघ लागते.

**घोडेपीर**—नाना फडणिसांचा विश्वासू नोकर नथूखा या नांवाचा होता. नानाच्या मृत्यूनंतर त्यानें त्यांची आठवण म्हणून दरवर्षी घोड्यावर ताबूत बांधण्यास सुरवात केली. तो मेल्यावर लोकांनीं चढाओढीनें वर्गणी करून त्याचा कार्यक्रम चालू ठेवला.

**अग्यारी**—पारशांचें मुख्य दैवत अग्नि असून त्याचें हें देवालय आहे. सोराबजी रतनजी यांनीं १८२४ सालीं हें बांधलें. पुढें १८७७ सालीं दस्तुर नसरवानजी जमाजस्पजी यांनीं त्याचा जीर्णोद्धार केला.

**बुधवार** पेठेंतून चालतांना जपून चालावयास पाहिजे. ही पेठ शहराच्या मध्यावर आहे त्यामुळें शहराचा मुख्य व्यापार येथेंच चालतो. टांगे, सायकली, ऑटोरिक्शा, बैलगाड्या, मोटारी व माणसें यांचा एकच धुमाकूळ बुधवार व बेलबाग चौकांत दिसून येतो. गर्दी आवरतां आवरतां पोलिसांना अगदीं नको होतें! या पेठेंत कापडवाले, टेलर, फोटोग्राफर, फुलवाले, सुंगधी, स्टेशनरी माल, पुस्तकविक्रेते, चष्मेवाले, घड्याळें यांचीं खच्चून दुकानें आहेत. लक्ष्मीरोडच्या दुतर्फा हीं दुकानें दिसतात. लक्ष्मीरोड गणेशपेठ गेटाजवळ सुरू होतो आणि लकडीपुलापर्यंत जातो. गणेश, रविवार, बुधवार, सदाशिव, नारायण व शुक्रवार या सर्व पेठांना चाटून हा रस्ता जातो. त्यामुळें सोन्यामारुती चौक, बेलबाग चौक, कुंटे चौक, ट्रेनिंग कॉलेज चौक असे मोठे मोठे चौक या रोडवर आहेत. सराफी, कापड व स्टेशनरीचीं मोठीं दुकानें याच रोडवर आहेत. बँका व इन्शुरन्स कंपन्यांची गर्दी याच रस्त्यावर! त्यामुळें सर्व वेषांचे, सर्व पेशांचे व सर्व दर्जाचे हजारों स्त्रीपुरुष या रस्त्यावरून जातात! जणुं त्यांचें सम्मेलनच रोज भरतें! गोखलेस्मारक मंदिर,

सरस्वती विलास बिल्डिंग, कॉमनवेल्थ विमा कंपनीची बिल्डिंग, नगरवाचन मंदिराची बिल्डिंग, सिटीपोस्ट ऑफिस, कन्हय्यालाल सराफ यांची बिल्डिंग यांनीं या रस्त्यास विशेषच शोभा आलेली आहे.

या पेठेंत काय पाहण्यासारखें आहे?

दगडू हलवाईचा दत्त, बेलबाग, नूतन मराठी विद्यालय हाय-स्कूल. **दगडू** हलवाईचा दत्त हें अनेक दत्तभक्तांचें आवडतें देऊळ आहे. **बेलबाग**—हें ठिकाण नाना फडणिसांनीं वसविलें. देवास चार गांवें इनाम मिळविलीं. आंत विष्णूचें सुंदर देऊळ असून देवळाची व्यवस्था पंचांमार्फत चालते. या ठिकाणीं पूर्वीं बेलाचीं झाडें होतीं म्हणून त्यास बेलबाग म्हणतात.

औरंगजेबानें बुधवार पेठ १६९० सालीं वसविली व त्यास मोहि-ताबाद असें नांव दिलें. थोरल्या माधवरावांच्या वेळीं खाजगीवाल्यांनीं या पेठेस बुधवार पेठ हें नांव दिलें.

भवानी पेठ ही नाना फडणिसांनीं मोठमोठ्या व्यापाऱ्यांना राह-ण्यास व वखारी घालण्यासाठीं वसविली. अद्यापहि या पेठेंत मोठ-मोठ्या वखारी आहेत.

या पेठेंतील **भवानीचें** देऊळ पाहण्यासारखें आहे. नवरात्रांत मोठी जत्रा भरते.

**सोमवार** पेठेस पूर्वीं शहापुरा म्हणत. या पेठेंत श्रीमंत गोसावी लोकांची वस्ती आहे. कानडी व मद्रासी लोकहि याच पेठेंत आहेत. या पेठेंत नागेश्वर व विष्णूचें देऊळ आहे.

**मंगळवार** पेठेस पूर्वी शाहिस्तेपुरा म्हणत. एके काळीं शहराचा मुख्य बाजार या पेठेंत होता. अलीकडे फक्त येथें सरपण, गवत व कडबा यांचाच बाजार चालतो.

श्रीमंत घोरपडे यांनीं आपल्या मुजफरजंग नांवाच्या शूर सेनापतीच्या स्मरणार्थ **मुजफरजंग पेठ** वसविली.

### प्रश्न

(१) "बुधवार पेठ" यावर १५ ओळी लिहा.

(२) टीपा लिहा :
घोडेपीर, अग्यारी, बेलबाग.

(३) मंगळवार पेठेस पूर्वी काय म्हणत असत ?

(४) भवानी पेठ......वसविली. पेठेंत मोठ्या......आहेत. ...... देऊळ प्रेक्षणीय आहे.

---

## पाठ ७ वा

# पुण्याची पाहणी (पुढें चालू)

**वेताळ पेठ !** वेताळाचें नांव ऐकून घाबरूं नका हं ! ! या पेठेस पूर्वी गुरुवार पेठ हें सुंदर नांव होतें. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत जिवाजीपंत खाजगीवाल्यांनीं ही पेठ वसविली. या पेठेंत वेताळाचें स्थान आहे म्हणून यास वेताळ पेठ म्हणतात. या पेठेंत सोनार लोकांची वस्ती बरीच आहे. पेठेंत पाहण्यासारखीं स्थळें म्हणजे वेताळाचें देऊळ व पारसनाथाचें मंदिर.

**वेताळाचें देऊळ:**—वेताळाची ओबडधोबड मूर्ति, वटवटीत डोळे आणि कल्लेदार मिशा पाहून भीति वाटते काय ? भिण्याचें

११२६५८ ३०।१२।५३

कारण नाहीं. या कोपऱ्यांत पहा पादुका आहेत. नंदादीप जळत आहे. या देवळांतील घंटा पहा. श्रीमंत पेशव्यांनीं ही नवसाची म्हणून येथें बांधली. तोफा चांगल्या घडाव्या म्हणून नवस केला होता! शुक्रवार हा वेताळाचा दिवस! त्या दिवशीं येथें गर्दी असते.

**पारसनाथाचें मंदिर**:—जैनांचा मुख्य देव पारसनाथ! पेशवे प्रथम मंदिर बांधण्यास सम्मति देत नव्हते; पण शंकराचार्यांची परवानगी आणून त्यांनीं मंदिर बांधलें. मंदिराभोंवतीं कडेकोट तट आहे.

८८८३

**रास्ता पेठ**:—आनंदराव रास्ते यांनीं ही पेठ वसविली. हिला पूर्वी शिवपुरी असें नांव होतें. रास्ते हे पेशव्यांचे घोडदळ प्रमुख होते. १७७९ सालीं त्यांनीं ९ लाख रुपये खर्चून वाडा बांधला. वाडा बांधण्यास ९ वर्षे लागलीं. आज १७० वर्षांनंतरहि वाडा मजबूत आहे. वाडा लाकडी असून सुंदर आहे. दोन मजले आहेत. वाड्याभोंवतीं मोठा उंच तट आहे. या पेठेंतील मुख्य ठिकाण **शिराळशेटचें !**

शिराळशेट हे लिंगायत जातींतील मोठे धनिक व सज्जन सावकार होते. त्यांची जत्रा श्रावणांत भरते.

पुण्यांतील सर्वांत मोठी पेठ कोणती? शुक्रवार! जिवाजीपंत खाजगीवाले यांनीं नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत ही वसविली. या पेठेंत आपण काय काय पाहिलें सांगा पाहूं?

**तुळशीबाग**:—राममंदिर किती छान आहे! केवढें विस्तीर्ण आवार आहे! आजूबाजूला भांडीं, दागिने व इतर वस्तूंचीं दुकानें आहेत. तुळशीबागेंत खरेदी करणें बायकांना आवडतें. पूर्वी येथें मोठी तुळशीची बाग होती म्हणून यास तुळशीबाग असें म्हणतात.

एक ओढाहि पूर्वी येथून वहात असे. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं हें बांधलें.

**महात्मा फुले मार्केट** ( मंडई ):—पूर्वी मंडई शनिवार वाड्याच्या उघडया पटांगणांत भरत असे; त्यामुळें तेथें अतिशय घाण व गलिच्छता होई. १८८५ सालीं ही डौलदार मंडई बांधण्यांत आली. तिला दोन लक्ष रुपये खर्च आला. कॉर्पोरेशन झाल्यापासून या मंडईची अधिक गाळे बांधून आणखी सुधारणा करण्यांत आली आहे. स्वच्छता देखील अधिक आहे ! या मंडईतील गर्दी कमी व्हावी म्हणून नव्या पुलाखालील जागेंत नवीन मंडई बांधण्याचें काम चालू आहे. मंडईतून फेरफटका करणें मोठें मजेचें असतें.

**इंपीरियल बँक** ( सिटी ब्रॅन्च ):—पुणें शहरांतील नागरिकांच्या सोईसाठीं १९२२ सालापासून ही बँक सुरू केली. यामुळें व्यापारी वर्गाची मोठीच सोय झाली आहे. **पोलिसांना** राहण्यासाठीं **पोलिस लाईन्स** याच पेठेंत आहेत.

**मीठ गंज** पेठेंत पूर्वी मिठाचे गंज पडलेले असत. या पेठेंत साळी, माळी व कोष्टी या लोकांची वस्ती आहे.

**घोरपडे पेठ:**—मालोजी भोसले यांनीं ही पेठ वसविली. घोरपडयांच्या सैन्याचा तळ येथें असे. मुसलमान, महार व चांभार यांची वस्ती आहे.

**न्याहाल पेठ:**—ही पेठ रास्ता पेठेलगत असून लहान आहे. कामगार-वस्ती आहे.

**नवी पेठ:**—ही सदाशिव पेठेलगतच वसली आहे. येथें पाहण्यासारखें काय आहे ? **अनाथपंगु गृह.**

**प्रश्न**

(१) शिराळशेट कोण ?

(२) टीपा लिहा:
वेताळाचें देऊळ, मंडई, तुळशीबाग.

(३) शब्द भरा.
नव्या पेठेंत......पहाण्यासारखें आहे. घोरपडे पेठ......यांनीं वसविली. येथें......, ......, व ......यांची वस्ती आहे. मीठगंज पेठेंत पूर्वीं......पडलेले असत.

---

## पाठ ८ वा

**नवें पुणें**:—नदीच्या पैलतीराला पहा. नवीन नवीन बंगले, आंखीव रस्ते आणि आटोपशीर झाडें दिसत आहेत. पुण्याची ही नवी वस्ती. नवा पूल ओलांडून गेल्यावर ही वस्ती लागते. येथील समाज पुढारलेला, सुशिक्षित व सुखवस्तु आहे. डेक्कन जिमखाना असें या भागास नांव आहे. येथें **काय काय पाहण्यासारखें आहे ?**

**डेक्कन व पी. वाय्. सी. जिमखाना**:—क्रिकेट व टेनिस यांचे हे माहेरघर आहेत. या ठिकाणीं या खेळाचें उत्तम शिक्षण मिळतें.

**आर्यभूषण छापखाना**:—पुण्यांतील जुना व प्रसिद्ध छापखाना.

**भांडारकर इन्स्टिटयूट**:—संस्कृत भाषेचें संशोधन व ग्रंथसंग्रह. याशिवाय या भागांत फर्ग्युसन कॉलेज, लॉ कॉलेज, थिऑसाफिकल

सोसायटी व प्रभात नगर इत्यादि पहाण्यासारखे आहेत. याच भागांत टिळक तलाव हा पोहण्याचा तलाव आहे.

येथूनच जवळ एरवंडणें असून तेथें हल्लीं कारखाने आहेत. आयुर्वेद रसशाळेचा कारखाना येथेंच आहे. त्याच्यापुढेंच हिंगणें असून तेथें गुरुवर्य कर्व्यांचा '**महिलाश्रम**' आहे. गरीब व अनाथ मुली व स्त्रिया यांच्या शिक्षणाची उत्तम सोय आहे. येथेंच नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठाचें कॉलेज आहे.


**गणेशखिंड रोड**:—हा रस्ता ऑब्झरवेटरीपासून गव्हर्नर हाऊसपर्यंत गेला आहे. येथील प्रेक्षणीय स्थळें—चतु:शृंगीचें देऊळ, गव्हर्मेंट हाऊसमधील पुणें विद्यापीठ व नॅशनल केमिकल लॅबोरेटरी.

**श्री चतु:शृंगीचें देवालय**:—हें देऊळ पेशवेकालीन असून येथें मोठें राजकारण चालत असे. नवरात्रांत मोठी यात्रा भरते. हवापाणी व निसर्ग शोभा उत्तम आहे.

**शिवाजीनगर**:—लकडी पूल ओलांडला कीं डेक्कन जिमखाना लागतो, तसाच नवापूल ओलांडला कीं शिवाजीनगर लागतें. पूर्वी भांबुर्डे नांवाचें हें खेडें होतें. परंतु नवापूल बांधल्यापासून या भागांत भराभर वस्ती होऊन त्याला जिमखान्याचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. जी. आय्. पी. रेल्वेचें स्टेशन शिवाजीनगर येथें आहे.

या विभागांत प्रेक्षणीय स्थळें कोणतीं ?

श्रीशिवाजी लष्करी शाळा, कोर्ट, रेल्वेस्टेशन, वेधशाळा ( सिमला ऑफिस ), संभाजी पार्क, एंजिनियरिंग कॉलेज, शेतकी कॉलेज, शिवाजी तलाव, श्रीशिवाजी आखाडा, कॉंग्रेसभुवन इत्यादि.



**काँग्रेस भुवन**:—महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसनें बांधलें. १९४० सालीं उद्घाटन. काँग्रेस पक्षाच्या सभा येथें होतात.

**श्रीशिवाजी आखाडा**:—पुण्यांत पहिलवानी शोक देखील आहे. मोठमोठ्या निकाली कुस्त्या येथें होतात. हजारों लोक जमतात.

**जुना बाजार**:—दर रविवारीं व बुधवारीं आखाडयाजवळील मोकळ्या जागेंत बाजार भरतो. जुन्या वस्तु, जनावरें, जुने कपडे, कपाटें, फर्निचर येथें मिळतें. खेडेगांवांतील लोक फार जमतात.

**पांडव लेणीं**:—**जंगलीमहाराज रोडवरील** जंगलीमहाराजांच्या देवळाजवळ हीं आहेत. एका दगडांत हें कोरीव काम केलेलें असून तें अत्यंत प्रेक्षणीय आहे.

### प्रश्न

(१) " डेक्कन जिमखाना " यावर १५ ओळी लिहा.
(२) भांडारकर इन्स्टिटयूट कशासाठीं प्रसिद्ध आहे ?
(३) पुण्यांतील जुना व प्रसिद्ध छापखाना कोणता ?
(४) भांबुर्डा कोठें आहे ? हल्लीं त्यास काय म्हणतात ?
(५) एरवंडणें का प्रसिद्ध आहे ?

## पाठ ९ वा

# लष्करांतून फेरफटका

लष्करांतील रस्ते कसे रुंद व आंखीव आहेत ! ऑफिसर लोकांचे मोठमोठे बंगले, मोटमोठीं दुकानें, हॉटेलें यानें लष्कर हद्दीची शोभा मोठी मजेदार दिसते. घोरपडी, माळी, मुंजरी व वानवडी या चार गांवांना नुकसानभरपाई देऊन इंग्रज सरकारनें लष्करासाठीं ही हद्द निर्माण केली.

१८४७ सालीं करमणुकीसाठीं **रेसकोर्स** बांधण्यांत आलें. पावसाळ्यांत येथें घोड्याच्या शर्यती होतात.

लष्करांतील कांहीं प्रमुख रस्ते लक्षांत आहेत काय ?

(१) अलेक्झांड्रा रोड, (२) अर्सेनल रोड, (३) बॉंबे रोड, (४) कॅनॉट रोड, (५) नेपिअर रोड, (६) प्रिन्स ऑफ वेल्स रोड, (७) ससून रोड, (८) महात्मा गांधी रोड, (९) व्हिक्टोरिया रोड, (१०) वानवडी लाइन्स.

**लष्करांत काय काय** पाहण्यासारखें आहे ?


(१) **जनरल पोस्ट ऑफिस**:—हें पुणें विभागांतील मुख्य पोस्ट ऑफिस. इमारत कॅनॉट रोडवर आहे. इमारत भव्य व प्रशस्त आहे.

(२) **कौन्सिल हॉल**:—ही इमारत क्वीन्स रोडवर आहे. १८६९ सालीं सरकारनें बांधली. मुंबई असेंब्लीचीं पावसाळी अधिवेशनें येथें भरतात. दरबार व स्वागत समारंभ अशा खाजगी कामासाठींहि उपयोग करतात. हॉलमध्यें गव्हर्नर, पेशवे, संस्थानिक यांचीं तैलचित्रें लावलेलीं आहेत. कौन्सिल हॉलच्या सभोंवतीं बाग आहे.

(३) **गारपीर**:—मक्केहून गारपीर नांवाचा कोणी अवलिया आला होता. त्याच्या मृत्यूनंतर भक्तांनीं कबर व मशीद बांधली.

(४) **ससून हॉस्पिटल**:—डेव्हिड ससून यांनीं २ लाख रुपये या हॉस्पिटलसाठीं दिले. त्यांत भर घालून ब्रिटिश सरकारनें हें हॉस्पिटल बांधलें. हॉस्पिटल मोटें भव्य असून रोग्यांना मोफत औषध मिळतें. इमारतीवरील घड्याळ सर्वांच्या सोईचें आहे.

(५) **स्मृति-स्तंभ**:—१९१४ सालच्या लढाईंत पतन पावलेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ हा स्तंभ बांधण्यांत आला. ससून हॉस्पिटलच्या हा समोर आहे.




(६) **पुणें स्टेशन**:—हें स्टेशन भव्य व विस्तीर्ण आहे. ४।५। प्लॅटफॉर्म्स आहेत. बाहेर प्रवाशांना उतरण्याची मोठी सोय आहे. टांगे, मोटारी, बसेस यांनीं बाहेरचें आवार गजबजलेलें असतें. पुणें स्टेशनांत फिरत राहिल्यास वेळ केव्हां निघून गेला हें देखील समजत नाहीं.

(७) **संगम**:—मुळा व मुठा नद्यांचा संगम येथें होतो. ठिकाण मोठें रम्य असून सहल काढण्यास छान आहे. मोहोरमचे ताबूत येथें बुडवितात.

(८) **येरवडा**:—हा पुण्याचाच एक भाग आहे. येथें मध्यवर्ति तुरुंग आहे. तसेंच लहानपणीं उनाडक्या व चोऱ्या करणाऱ्या मुलांकरितां रेफमेंटरी, वेडयाचें इस्पितळ, पर्णकुटी व आगाखान पॅलेस या गोष्टी पाहण्यासारख्या आहेत.

**मध्यवर्ति तुरुंग**:—तुरुंग पाहण्यास मेडिकल ऑफिसरची परवानगी काढावी लागते. येथें मोठा छापखाना असून तुरुंगांतील कैदी कामगार छपाईचीं कामें करतात. सरकारी छपाई येथून काढतात.

**रेफमेंटरी स्कूल**:—शिक्षा झालेल्या मुलांना वळण लावण्यासाठीं येथें सुतारकाम, फर्निचर वर्क इत्यादि शिकवितात.

**पर्णकुटी**:—महात्मा गांधीनीं २१ दिवस येथें उपवास केला होता, त्यामुळें ही भारतांत प्रसिद्ध आहे.

**आगाखान पॅलेस**:—हा मोठा रम्य व भव्य प्रासाद आहे. महात्मा गांधींना १९४२ च्या चळवळींत येथें ठेवलें होतें. कस्तुरबा व महादेवभाई देसाई यांच्या समाधी येथें आहेत. नामदार आगाखान हे जगांत श्रीमंत म्हणून प्रसिद्ध असून निरनिराळ्या देशांत त्यांचे बंगले आहेत.

**बंड गार्डन**:—ही एक रमणीय व कौशल्यपूर्ण रचलेली बाग आहे. फळें, फुलें, कारंजीं यांची मांडणी मनोहर आहे. हें ठिकाण सहलीस छानदार आहे.

**दि एम्प्रेस गार्डन**:—या बागेस पूर्वीं 'सोल्जर बाग' म्हणत. या ठिकाणीं उत्तम बी-बियाणें विकत मिळतें. दुर्मिळ फुलें व फळें

यांचा संग्रह येथें आहे. बागेंत लावण्यासाठीं कुंड्या येथें मिळतात. या ठिकाणीं फिरावयास गेल्यास वेळ केव्हांच निघून जातो.

**शिंद्यांची छत्री:**—पेशवाईंत गाजलेले महादजी शिंदे वानवडी येथें मरण पावले. त्यांच्या स्मरणार्थ शिंदे सरकारनें छत्री बांधलेली आहे. ही छत्री मोठी प्रेक्षणीय आहे. लष्करांतून बसनें जाण्याची सोय आहे. पाहुण्यांना दाखविण्याजोगें हें स्थान आहे.

**गुलटेकडी:**—वानवडीच्या बाजूस ही छोटी टेकडी आहे. पेशव्यांच्या वेळीं येथें हत्तींची झुंज होत असे.


**खडकी:**—हा पुण्याचाच एक भाग असून येथें स्वतंत्र स्टेशन आहे. लष्कर ठेवण्याची सोय असून भारत सरकारचें लष्करी ठाणें येथें आहे. येथें दारूगोळा करण्याची फॅक्टरी आहे. तेथें झडती घेतल्याशिवाय आंत सोडीत नाहींत. खडकीमधील प्रेक्षणीय स्थळें—बोटॅनिकल गार्डन, गव्हर्मेंट पोल्ट्री, डेअरी फार्म, ॲग्रिकल्चरल कॉलेज, इत्यादि.

### प्रश्न

(१) लष्कर कोठें आहे ? त्याला महत्त्व कां ?
(२) लष्करांतील प्रमुख रस्ते कोणते ?
(३) टीपा लिहा:
जनरल पोस्ट ऑफिस, पर्णकुटी, शिंद्याची छत्री.
(४) 'पुणें स्टेशन' यावर २० ओळी लिहा.
(५) ससून हॉस्पिटलची माहिती लिहा.

## पाठ १० वा

# पुण्यानजीक सहलीस जाण्यास योग्य ठिकाणें कोणतीं ?



**सिंहगड:**—पुण्यापासून १६ मैलांवर आहे. मोटारची सोय आहे.

**शुलेश्वर:**—— सोलापूर लाईनच्या रेल्वेमध्यें बसून यवतला उतरावें, तेथून जवळच आहे.

**कार्लें:**—लोणावळा लोकल-मध्यें बसून मळवलीस उतरावें. तेथून प्रसिद्ध कार्लें लेणीं पाहावयास मिळतील.

**पद्मावती:**—स्वारगेट-हून सातार्‍याकडे जाणार्‍या रस्त्यावर देवीचें देऊळ आहे.

**अरण्येश्वर**:——पद्मावतीच्या अलीकडे आहे. सकाळीं २ तासांत जाऊन येतां येतें. खेळण्यासाठीं मोठें मैदान आहे.

**कोथरूड-हिंगणें:**—जिमखान्यावरील कर्वे रोडनें जावें. खेडे-गांवचें वातावरण आढळेल.

**आळंदी:**—ज्ञानेश्वरांचें हें प्रसिद्ध ठिकाण पुण्यापासून १७ मैल आहे. सायकल किंवा मोटारनें जातां येतें.

**देहू व चिंचवड:**—रेल्वेनें जातां येतें. दोन्ही स्टेशनें आहेत. चिंचवडला मोरया गोसाव्यांची समाधि आहे. देहू हें तुकाराम महाराजांचें गांव आहे.

**पाषाण:**—पुण्याहून जवळ आहे. महादेवाचें स्थान आहे.

**खडकवासला धरण:**—पुण्याहून ६ मैलांवर आहे. धरण पाहण्यासारखें आहे.

**विठ्ठलवाडी:**—पुण्याहून तीन मैलांवर आहे. पर्वतीच्या मागील बाजूनें रस्ता जातो. विठ्ठलाचें स्थान रम्य आहे.

याशिवाय चतु:शृंगी, बंड गार्डन, बोटॅनिकल गार्डन, एम्प्रेस गार्डन, संगम, पुणें स्टेशन, वानवडी येथील शिंद्यांची छत्री, हडपसर या ठिकाणीं सहली नेतां येतील.



## पुण्याजवळील पाहतां येण्याजोगे किल्ले :

**रायगड:**—शिवाजी महाराजांची राजधानी; पुणें ते महाड मोटारचा प्रवास; नंतर महाडहून रायगडला जावयाचें.

**शिवनेरी:**—पुणें ते जुन्नर मोटारचा प्रवास; नंतर जुन्नरहून शिवनेरी हें शिवाजी महाराजांचें जन्मस्थान पहावयाचें !

**प्रतापगड:**—पुणें ते वाई मोटारनें प्रवास. नंतर वाईहून प्रतापगड.

**महाबळेश्वरः**—पुणें ते महाबळेश्वर मोटारनें प्रवास. उन्हाळ्यांत हवा थंड.

**लोणावळाः**—पुणें ते लोणावळा रेल्वेचा प्रवास. घाटमाथ्यावरील उत्तम ठिकाण.

### प्रश्न

(१) "सिंहगड" यावर १५ ओळी लिहा.

(२) टीपा लिहा :
   कार्ले, विठ्ठलवाडी, पाषाण, लोणावळा, रायगड.

(३) शिवनेरीची प्रसिद्धी कशासाठीं आहे ?

(४) आळंदी...क्षेत्र म्हणून...आहे....हें ठिकाण पुण्यापासून...आहे.

---

## पाठ ११ वा

# विद्येचें माहेरघर

पुणें हें शिक्षणासाठीं प्रसिद्ध आहे. सर्व प्रकारच्या शाळा व कॉलेजें आपल्या पुण्यांत आहेत. प्राथमिक शिक्षणासाठीं म्युनिसिपालिटीच्या शाळा पेठापेठांतून आहेत. तेथें मोफत शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षणासाठीं खासगी शाळा देखील आहेत. नू. म. वि. मराठी शाळा, नवीन मराठी शाळा व भावे प्राथमिक शाळा, यांसारख्या अनेक खाजगी शाळा आहेत. माध्यमिक शिक्षण घेण्यासाठीं प्रसिद्ध अशीं हायस्कुलें आहेत.

**नू. म. वि. हायस्कूलः**—सुमारे २००० विद्यार्थ्यांची सोय आहे. पुण्याच्या मध्यवस्तींत बुधवार पेठेंत आहे. शाळेचा लौकिक महाराष्ट्रभर पसरलेला आहे. अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व

शारीरिक विकासाकडे लक्ष दिलें जातें. नू. म. वि. चा विद्यार्थी शालान्त परीक्षेंत जसा चमकेल तसाच तो क्रिकेटच्या मैदानावर देखील चमकेल. शाळा 'मराठीचे शिवाजी' चिपळूणकर यांच्या स्मरणार्थ स्थापन झाली आहे. मराठीला फार महत्त्व आहे. या शाळेंत गीता परीक्षा, चिपळूणकर परीक्षा, प्राज्ञपरीक्षा, चित्रकला, हिंदी, बुक कीपिंग इत्यादि बाहेरील परीक्षांस देखील विद्यार्थी बसतात. **स्थापना १८८३.**



**न्यू इंग्लिश स्कूलः—** नू. म. वि. सारखीच ही शाळा पुण्यांत गाजलेली आहे. पुण्यांतील ही पहिली राष्ट्रीय वृत्तीची शाळा चिपळूणकरांनीं या शाळेची स्थापना केली. नानावाडा व रमणबाग या दोन शाखा या शाळेच्या आहेत. स्थापना १८८०.

**मॉडर्न हायस्कूलः**—जंगलीमहाराज रोडवर ही शाळा असून अलीकडे ही शाळा फारच पुढें येऊं लागली आहे. शालान्त परीक्षेंत या शाळेंतील विद्यार्थी अलीकडे चमकत असतात. शाळेचा निकाल देखील उत्तम लागतो.

**भावे स्कूलः**—ही पुण्यांतील जुनी शाळा आहे. या शाळेची जिमखान्यांवर दुसरी शाखा आहे. पेरुगेटाजवळील शाळेंतच एका बाजूला मुलींचें हायस्कूल आहे. या शाळेनें अलीकडे बरीच प्रगति केली आहे. शालान्त परीक्षेंत विद्यार्थी बरेच वर येतात.

**हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्सः**—(हुजूरपागा)—स्त्री-शिक्षणांत गेल्या ६५ वर्षांत काय संक्रमणें झालीं यांचें बोलतें उदाहरण ही शाळा आहे. सर जेम्स यांनीं १८८४ मध्यें या संस्थेचें उद्घाटन केलें. ह्या शाळेच्या शेकडों सुशिक्षित मुलींनीं राजकारणांत वांटा उचलला आहे. या शाळेची इमारत भव्य व टोलेजंग असून तिनें एक चौक व्यापला आहे.

**श्रीशिवाजी प्रिपरेटरी स्कूलः**—या शाळेमध्यें लष्करी शिक्षण मिळतें. हैद्राबाद, म्हैसूर, पंजाब, संयुक्तप्रांत, बंगाल, वऱ्हाड इत्यादि सर्व ठिकाणचे लोक या ठिकाणीं शिकावयास येतात. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी व्यापारी आपलीं मुलें या ठिकाणींच शिक्षणास पाठवितात. शाळेची इमारत भव्य असून वसतिगृहाची सोय आहे. शाळेंत सुमारें २५० विद्यार्थी शिक्षण घेतात. घोड्यावर बसणें, पोहणें, बॉक्सिंग, इत्यादि येथें शिकवितात.

**सरस्वती मंदिरः**—या संस्थेची पूना इंग्लिश स्कूल व पूना नाईट स्कूल अशीं दोन हायस्कूलें आहेत. शाळेनें नातु बागेंत नवीन इमारत बांधली आहे. दिवसा उद्योग करून रात्रीं शिक्षण घेतां यावें म्हणून नाईट स्कूल काढलें आहे. या संस्थेचा अनेक गरीब विद्यार्थ्यांनीं फायदा घेतला आहे. आजहि अनेक विद्यार्थी नोकरी करून शिकत आहेत.

**आयडियल इंग्लिश स्कूलः**—मोठ्या शाळांतून 'साभार परत' आलेला विद्यार्थी येथें येतो. अशा विद्यार्थ्यांची अभ्यासांत प्रगति

करून घेणें व त्यांना शालान्त परीक्षेंत यश मिळवून देणें हें कठीण कार्य ही शाळा करीत आहे.

**अहिल्यादेवी हायस्कूलः**—इंदूरच्या होळकर सरकारांकडून मोठी मदत झालेली आहे. १९३९ सालीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें ही शाळा काढली. यापूर्वी मुली न्यू इंग्लिश स्कूलमध्यें जात. अल्प काळांत देखील या शाळेनें प्रगति केली आहे.

**श्री शिवाजी मराठा हायस्कूलः**—बहुजन समाजांत शिक्षणाची जागृति करण्याच्या हेतूनें ही शाळा काढण्यांत आली. श्री. बाबूराव जगताप यांनीं या शाळेची भरभराट करण्यासाठीं अतिशय कष्ट सोसले आहेत. या शाळेंत १॥ हजार विद्यार्थी आहेत. स्थापना १९१८.

**श्री गोपाळ हायस्कूलः**—सदाशिव पेठेंतील चिमण्या गणपतीजवळ ही शाळा असून शाळेनें गेल्या २५ वर्षांत बरीच प्रगति केली आहे.

**महाराष्ट्र हायस्कूलः**—पुणें अनाथ विद्यार्थीगृहाचें कार्य माहीत नाहीं असा कोण आहे? गरीब विद्यार्थ्यांना राहण्याची व शिक्षणाची मोफत सोय या संस्थेनें केली आहे. महाराष्ट्र हायस्कूल ही या संस्थेची शाळा असून त्या शाळेची प्रगति उत्तम आहे. १९५१ सालच्या एस्. एस्. सी. परीक्षेंत या शाळेंतील श्री. पेंडसे हे चौथे आले! या शाळेंत शिकून वर आलेली अनेक विद्वान् मंडळी महाराष्ट्रांत आहेत!

याशिवाय पुण्यांत **खालील प्रमुख** शाळा आहेत:

(१) श्रीकृष्ण नाईट स्कूल व प्रोग्रेसिव्ह हायस्कूल.

(२) रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीचें हायस्कूल.

(३) भारत हायस्कूल.
(४) वेलणकर हायस्कूल.
(५) सेंट मेरीज् हायकूल फॉर गर्ल्स.
(६) दी बिशप्स हायस्कूल.
(७) कँप एज्युकेशन सोसायटीचें हायस्कूल.
(८) आगरकर हायस्कूल.
(९) पुणें सेवासदन हायस्कूल.

## पुण्यांतील कॉलेजें

(१) **सर परशुरामभाऊ कॉलेजः**—( १९१६ स्थापना ) टिळकरोडवरील हें प्रसिद्ध कॉलेज आहे. आर्ट्स् व सायन्स या शाखांचे एम्. ए. व एम्. एस्सी पर्यंत शिक्षण मिळतें. हें कॉलेज शिक्षण प्रसारक मंडळीचें आहे. प्रवेश मॅट्रिक झाल्यावर.

(२) **फर्ग्युसन कॉलेजः**—हें फार जुनें व राष्ट्रीय वृत्तीचें पहिलें कॉलेज आहे. या कॉलेजांत एम्. ए. व एम्. एस्सी. पर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे.

(३) **कॉमर्स कॉलेजः**—हें फर्ग्युसन कॉलेजच्याच आवारांत असून कॉलेजच्या इमारतीचें बांधकाम चालू आहे. येथें एम्. कॉम् पर्यंतचें शिक्षण मिळतें. प्रवेश मॅट्रिक झाल्यावर.

(४) **लॉ कॉलेजः**—हें कायद्याचें कॉलेज पुण्यांतील प्रसिद्ध व गाजलेलें आहे. या ठिकाणीं एल्एल्. बी. व एल्एल्. एम्. पर्यंत शिक्षण मिळतें. इंटर झाल्यावर प्रवेश मिळतो.

(५) **इंजिनियरिंग कॉलेजः**—हें सरकारी कॉलेज असून नांवाजलेलें आहे. येथें बी. ई. व डी. सी. ई. डी. एम्. ई. यांचें शिक्षण मिळतें. बी. ई.च्या पदवीसाठीं इंटर सायन्स झाल्यावर प्रवेश

मिळतो. डी. सी. ई. व डी. एम्.ई. या डिप्लोम्यांसाठीं मॅट्रिकनंतर प्रवेश मिळतो.

(६) **शेतकी कॉलेजः**—हें सरकारी कॉलेज आहे. या ठिकाणीं एम्. एस्सी. (अग्री.) पर्यंत शिक्षण मिळतें. एफ्. वाय्. सायन्स झाल्यावर प्रवेश मिळतो.

(७) **बी. जे. मेडिकल कॉलेजः**—हें ससून हॉस्पिटलजवळ असून येथें एम्. बी. बी. एस्., एम्. डी. पर्यंतचें शिक्षण मिळतें. इंटर सायन्स पास झाल्यावर प्रवेश मिळतो.

(८) **एम्. ई. एस्. कॉलेजः**—हें नुकतेंच स्थापन झालें आहे. येथें बी. ए. व बी. एस्सी. पर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे.

(९) **वाडिया कॉलेजः**— हें कँपमध्यें असून यांत एम्. ए. व एम्. एस्सी. पर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे.

(१०) **रेडियो स्कूलः**—परशुरामभाऊ कॉलेजांत हें असून रेडियोसंबंधीं शिक्षण मिळतें. १ वर्षाचा कोर्स.

(११) **अकाउंटन्सी कॉलेजः**—जी. एम्. ओकांचें हें कॉलेज असून सी. ए. च्या परीक्षेसाठीं विद्यार्थी घेण्यांत येतात.

## प्रश्न

(१) टीपा लिहाः

नू. म. वि., न्यू इंग्लिश स्कूल, मॉडर्न हायस्कूल, हुजुरपागा.

(२) शिवाजी प्रिपरेटरी स्कूल कशासाठीं प्रसिद्ध आहे ?

(३) "महाराष्ट्र हायस्कूल" कोणतें कार्य करीत आहे ?

(४) "पुण्यांतील कॉलेजें" यावर २० ओळी लिहा.

## पाठ १२ वा

# पुण्यांतील संस्था

(१) **लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय**–(स्था. १८९०) संग्रहालयांत माहिती विभाग, ग्रंथालय, व्यापार संवर्धनगृह, औद्योगिक प्रदर्शनें इत्यादि विभाग आहेत.

(२) **पुणें सेवासदन सोसायटी**:—१९०७ सालीं देवधरांनीं स्थापिली. स्त्रियांस धार्मिक, वाङ्मयात्मक, शास्त्रीय, वैद्यकीय, औद्योगिक, प्राथमिक, दुय्यम व महाविद्यालयीन वगैरे बौद्धिक शिक्षण द्यावें असा या संस्थेचा उद्देश आहे. गरीब, कुलीन विधवांना शिक्षण देण्याचें काम या संस्थेनें प्रथम हातीं घेतलें. शिक्षणाची आवड असलेल्या ४० वर्षांच्या स्त्रिया देखील हौसेनें मराठी दुसरी तिसरीच्या वर्गांत बसतात ! संस्थेचें वसतिगृह आहे. सोसायटीच्या सातारा, मुंबई, बारामती, नगर, सोलापूर इत्यादि ठिकाणीं शाखा आहेत.

(३) **महाराष्ट्रीय मंडळ**:—स्थापना १९२४. महाराष्ट्रीय लोकांत व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उद्देशानें हें स्थापन करण्यांत आलें. या ठिकाणीं अनेक स्त्रीपुरुषांनीं शारीरिक शिक्षणाचा फायदा घेतला आहे. पोहण्याचे वर्गहि येथें चालतात. महाराष्ट्रीय तरुणांना लष्करांत जाण्यासाठीं मार्गदर्शन करण्याचा वर्गहि येथें चालतो.

(४) **रानडे इंडस्ट्रियल अ‍ॅन्ड इकॉनॉमिक इन्स्टिटयूट**:—न्यायमूर्ति रानडयांच्या स्मरणार्थ ही संस्था स्थापन केली. येथें संशोधन कार्य चालतें.



**(५) भारत इतिहास संशोधक मंडळ**:—स्थापना शके १८३२. इतिहासाचार्य राजवाडे यांनीं स्थापन केली. इतिहासाचें संशोधन येथें चालतें. दत्तोपंत आपटे, महामहोपाध्याय पोतदार, इत्यादि इतिहासकारांनीं येथें बरेंच कार्य केलें आहे.



**(६) भारत सेवक समाज**:—नामदार गोखले यांनीं १९०५ सालीं ही संस्था स्थापिली. फर्ग्युसन कॉलेजचे मागें टेकडीच्या पायथ्याशीं आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्य करून समाजाची सेवा करण्याचा उद्देश आहे. ज्ञानप्रकाश हें वर्तमानपत्र प्रसिद्ध होत असे.

(७) **वसंत व्याख्यानमाला**:—दर मे महिन्यांत निरनिराळे विद्वान् बोलावून व्याख्यानें करण्याचा पुण्यांत प्रघात आहे. १८७५ सालीं स्थापना. टिळकस्मारक मंदिरांत व्याख्यानें होतात.

(८) **आनंदाश्रम**:—स्थापना १८८८. जुन्या व महत्त्वाच्या पोथ्यांचा संग्रह आहे. विद्यार्थी व संन्यासी यांच्या राहण्याची सोय येथें आहे.

(९) **किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल**:—सातव्या एडवर्ड बादशहाच्या स्मरणार्थ १९१२ सालीं स्थापना. गरीब लोकांची यामुळें सोय झाली. येथें मिडवाईफ्री शिक्षणाची सोय आहे.

(१०) **आर्य समाज स्थापना**:—१९१८. मानव जातीच्या उन्नतीसाठीं आर्य समाजी पंडितांचीं व्याख्यानें होतात. ठिकाणः २४८ नाना पेठ, पुणें.

(११)**भारत आर्ट वर्क्स**:—स्थापना १९३२. फावल्या वेळांत छोटे उद्योगधंदे कसे करावे यांचें शिक्षण मिळतें.

(१२) **आयुर्वेद महाविद्यालय**:—स्था. १९१२. या महाविद्यालयांत मॅट्रिकनंतर प्रवेश मिळतो. संस्कृत चांगलें पाहिजे. ४ वर्षांनंतर आयुर्वेद विद्याविशारद अशी पदवी मिळते. सरकारी मान्यता आहे.

(१३) **ताराचंद रामनाथ हॉस्पिटल**:—स्था. १९२५. पुण्यांतील गरीब लोकांना हें सोयीचें आहे. हें हॉस्पिटल लोकप्रिय असून नेहमीं भरलेलें असतें.

(१४) **गोवर्धन संस्था, वाई**:—स्थापना १९०५. भारतभूमींत गाय प्रिय आहे. तिची हत्या होऊं नये व भारताच्या संतानांना

गाईचें दूध मिळावें हा उद्देश या संस्थेचा आहे. संस्थेचा व्याप मोठा आहे. त्यांनीं उत्तम कार्य केलें आहे.

(१५) **पुणें मराठी ग्रंथालयः**—स्थापना १८३३ शके. येथें अनेक दुर्मिळ ग्रंथ आहेत. बी. ए. व एम्. ए. चे विद्यार्थी याचा फायदा घेतात.

(१६) **अनाथ हिंदु महिलाश्रमः**—स्थापना १९३५. अनाथ हिंदु स्त्रियांना व मुलींना येथें आश्रय मिळतो व योग्य मार्गदर्शन करण्यांत येतें.

(१७) **मराठा चेंबर ऑफ कॉमर्सः**—स्थापना १९३४. महाराष्ट्राची औद्योगिक व व्यापारविषयक भरभराट व्हावी हा उद्देश आहे. व्यापाऱ्यांना मार्गदर्शन करण्यांत येतें.

(१८) **दि नॅशनल मॉडेल स्कूलः**—स्थापना १९४७. या ठिकाणीं भारती मिलिटरी अकॅडेमीच्या स्पर्धा परीक्षेसाठीं विद्यार्थी तयार केले जातात.

(१९) **ज्ञानेश्वर तुकाराम मिशनः**—गरिबांना कमी खर्चांत किंवा विनामूल्य वैद्यकीय मदत करणें, समाजांत ऐक्य व बंधुभाव निर्माण करणें हा उद्देश. डॉ० चाफेकर यांचे या बाबतींत प्रयत्न चालू आहेत.

(२०) **नाथीबाई दामोदर ठाकरसी कॉलेजः**—हें कॉलेज इंडियन वुमेन युनिव्हर्सिटी ( कर्वे विद्यापीठ ) ला जोडलें आहे. येथें मॅट्रिकनंतर ३ वर्षांचा कोर्स आहे. स्त्रियांसाठींच कॉलेज आहे. ग्रॅज्युएट इन् आर्ट्स् ही पदवी मिळते. कॉलेजच्या आवारांत होस्टेल आहे. ५५ विद्यार्थिनींची सोय आहे.

**(२१) लॉ ॲकेडमी:**—स्थापना १९४५. कायद्याची चर्चा करण्यासाठीं व कायदेविषयक ज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं वकील मंडळींनीं ही संस्था स्थापिली. निरनिराळीं पुस्तकें संस्थेनें मराठींत छापलीं आहेत. तीं नागरिकांना फार उपयुक्त आहेत.

**(२२) महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा:**—स्थापना १९३७. हिंदी भाषेचा प्रसार करून विविध प्रकारच्या हिंदीच्या परीक्षा घेतल्या जातात.

**(२३) पुणें जिल्हा होमगार्ड:**—पोलिस हेड कार्टर्ससमोर. टेलिफोन नं. ३६४४. समाजाची सेवा करतां यावी हा उद्देश आहे. नागरिक यांत भाग घेतात. सभा, व्याख्यानें, उत्सव, प्रदर्शनें यांचा बंदोबस्त ठेवून जनतेची गैरसोय हे दूर करतात. आठवडयांतून ठराविक दिवशीं परेड असते. पोषाख मिळतो. स्त्रियांचीहि एक शाखा आहे.

**(२४) पुणें विद्यापीठ:**—स्था. १९४८. पुण्यासारख्या शिक्षण केंद्राचें विद्यापीठ नसावें ही गोष्ट लोकांना फार जाणवत असे. १९४८ सालीं हें विद्यापीठ स्थापण्यांत आलें. नामदार जयकर यांचे उपकुलगुरु आहेत. पुण्यांतील सर्व कॉलेजें, तसेंच नाशिक, नगर, सातारा, रत्नागिरी येथील कॉलेजें या विद्यापीठास जोडलेलीं आहेत.

**(२५) हिमालय मंडळ:**—स्थापना १९४९. जगांतील अत्यंत उंच अशा गौरी शिखरावर आक्रमण करण्याचा उद्देश आहे.

**आरोग्य मंडळ, पुणें**—आरोग्य मंडळ, पुणें, ही संस्था सन १९१४ मध्यें स्थापन झाली असून, ती आज तीन तपांच्यावर पुणें शहर व त्या लगतचा भाग यांतील आरोग्य व स्वच्छता राखण्याचें

व संवर्धनाचें कार्य यथाशक्ति करीत आहे. संस्था सन १८६० चे कायद्यान्वयें नोंदविली असून, तिची रीतसर घटनाही आहे. पुणें महानगर पालिका व मुंबई सरकार ह्यांची मंडळास मान्यता असून त्यांचेकडून वेळोंवेळीं आर्थिक मदतही मिळत आहे. "आरोग्य हेंच खरें राष्ट्रधन" हें मंडळाचें ब्रीदवाक्य आहे. रविवार पेठेंत 'बाल-संगोपन केंद्र' अत्यंत उत्तम रीतीनें चालविलें आहे व त्या कार्याची आणि पुणें शहरांतील बालमृत्यूंची संख्या कमी करण्याचे कार्याची अनेकांनीं मुक्तकंठानें स्तुति केली आहे. निरनिराळ्या पेठांची आरोग्यदृष्ट्या तपासणी करणें, यात्रांचे वेळीं आरोग्यप्रचार करणें, रुग्णसाहित्य देणें, प्रदर्शनें भरविणें वगैरे अनेक उपयुक्त कार्यें संस्था करीत आहे. डॉ. व्ही. एल्. साठे हे मंडळाचे अध्यक्ष असून श्री. पोपटलाल शहा, श्री. ना. वि. भोंडे, प्रा. डॉ. न. का. घार-पुरे, श्री. बाबासाहेब रानडे, डॉ. घैसास, डॉ. पराडकर, डॉ. वैद्य, श्री. गोखले, सौ. मंगलाबाई करंदीकर यांच्यासारखीं सार्वजनिक हितकर्तीं माणसें कार्यकारी मंडळांत आहेत.

### प्रश्न

(१) टीपा लिहा :

सेवासदन सोसायटी, महाराष्ट्रीय मंडळ, भारत सेवक समाज.

(२) आनंदाश्रम कशासाठीं प्रसिद्ध आहे ?

(३) "पुणें विद्यापीठ" यावर १५ ओळी लिहा.

(४) पुण्यांतील हिंदीचें शिक्षण कसें काय चाललें आहे ?

## पाठ १३ वा

# पुण्यांत कोठें काय मिळतें ?

मुलांनो, तुम्ही ज्या शहरांत राहतां त्या शहरांत लक्षावधी दुकानें आहेत. पण कोणाकडे काय मिळतें याची नेमकी माहिती नसल्यानें गरज लागली कीं आपण हुडकावयास लागतों. तुम्हांला थोडीफार माहिती असली तर लगेच 'मुलगा मोठा चलाख नि चौकस आहे बरं का !' असें म्हणून तुमचें कौतुक होतें. ही माहिती जातां जातां लक्षांत ठेवा हं ! पुण्यांत प्रसिद्ध व्यापारी पुष्कळच आहेत. परंतु जागेच्या अभावीं कांहीं थोड्यांचींच नांवें दिलीं आहेत.

(१) **मोटारीच्या सामानाचे व्यापारी:**—जोग ब्रदर्स, गंगा निवास, सदाशिव पेठ, नॅशनल ऑटोमोबाइल्स १३३८ शिवाजी-नगर, ईस्टर्न मोटार स्टोअर्स ईस्ट स्ट्रीट, पुणें, कँप.

(२) **सायकल कंपन्या:**—बॉंवे सायकल ॲन्ड मोटार कंपनी, ४९७ बुधवार, इंग्लिश सायकल कंपनी ८८ मेनस्ट्रीट लष्कर, पूना सायकल स्टोअर्स, ६०३ बुधवार, पुणें २.

(३) **लोखंडाचे व्यापारी:**—गोडबोले ॲन्ड कंपनी, ८०२ सदाशिव पेठ, साठे रंग भांडार, गोखले हॉलसमोर, लक्ष्मी रोड, दादाभाई ईस्माईल ॲन्ड कंपनी मेनस्ट्रीट, पुणें २.

(४) **पेढे व मेवामिठाई:**—घोडके पेढेवाले, गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २. दगडु हलवाई दत्तमंदिर, बुधवार, पुणें २. आरोग्यमंदीर, गोखले हॉलसमोर. लक्ष्मीरोड, स्वीट होम, फडतरे चौक, सदाशिव पेठ.

(५) **होलसेल स्टेशनरी व कट्लरी आणि टॉयलेट:**—इंपिरियल स्टेशनरी मार्ट, न्यू किताब बिल्डिंग्ज, लक्ष्मीरोड. सुभाष जनरल स्टोअर्स, २४८ बुधवार, पुणें २.

(६) **बेकर्स अॅन्ड कन्फेक्शनर्स:**—साठे ब्रदर्स, भवानी पेठ, पुणें २. न्यू बाँबे बेकरी, रास्ता चौक, पुणें २.

(७) **स्टेशनर्स अॅन्ड जनरल मर्चन्टस्:**—ऑनेस्टी अॅन्ड कंपनी, बुधवार चौक. व्हरायटी स्टोअर्स, सेवासदन, बिल्डिंग्ज. व्ही. जी. गोखले, २५७ बुधवार, पुणें २. पटवा ब्रदर्स, ६३४ बुधवार, पुणें २.

(८) **प्लंबर्स अॅन्ड सॅनिटरी कॉंट्रॅक्टर्स:**—बी. एस्. भरुचा आणि कंपनी, १०८ म. गांधी रोड, शहाबाद स्टोन कंपनी, १७२३ शुक्रवार, पुणें २.

(९) **मोत्यांचे व्यापारी:**—देवधर मोतीवाले, ९३२ व ९६२ सदाशिव लक्ष्मी रोड, पुणें २; लागू बंधू, १०१३ सदाशिव, पुणें २.

(१०) **टेलर्स अॅन्ड औटफिटर्स:**—पटवर्धन टेलर्स अॅन्ड क्लॉथ मर्चंट्स, सरस्वती विलास, पुणें २. आठवले ब्रदर्स टेलर्स, सदाशिव पोस्टाजवळ, पुणें २. कृष्णराव सदरे अॅन्ड कंपनी, ९ बुधवार पुणें २. महिंद्रकर ब्रदर्स, आगीचे बंबखान्यावर, बुधवार पुणें २. रिजेंट स्टोअर्स टेलर्स, २१ म. गांधी रोड, पुणें २.

(११) **रबर इंडस्ट्रीज:**—हिंदुस्थान रबर प्रॉडक्टस्, ११० मंगळवार, पुणें २. स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि., शुक्रवार पुणें २.

(१२) **गाद्यांचे कारखानदार:**—डेक्कन आयर्न अॅन्ड कॉटन वर्क्स, ८९९ सदाशिव, पुणें २. उद्योगमंदिर, सदाशिव, पुणें २.

(१३) **लोखंडी फर्निचरचे कारखानदारः**—जनरल मेटॅलिक वर्क्स, लक्ष्मीरोड, पुणें २.

(१४) **लेखन मुद्रण व साहित्य विक्रेतेः**—ऑनेस्टी कंपनी, बुधवार चौक. एम्. आर. जोशी लक्ष्मीरोड पुणें २. ठाकूर ब्रदर्स, ४९५ शनवार, पुणें २.

(१५) **बीं-बियाणेंः**—विष्णु सदाशिव आणि कंपनी, ससून हॉस्पिटलसमोर पुणें २. गांधी आणि कंपनी, शिवाजी रोड, पुणें २.

(१६) **लॉजिंग ॲन्ड बोर्डिंग हाउसेस्ः**—बादशाही बोर्डिंग ॲन्ड लॉजिंग हाऊस, टिळक रोड. दवे हिंदु हॉटेल, पुणें स्टेशनासमोर. गुजरात हिंदु लॉज, दाणे आळी. हॉटेल कोहिनूर, ३ क्वीन्स गार्डन रोड. पूना गेस्ट हाऊस, लक्ष्मी रोड. प्रशान्त गेस्ट हाऊस, टिळक रोड, पुणें.

(१७) **प्रसिद्ध हॉटेल्स्ः**—संतोषभुवन, नू. म. वि. हायस्कूल जवळ, पुणें २. बॉम्बे रेस्टारंट, पेरुगेट, पुणें २. जीवन—टिळक रोड, पुणें २. न्यू लक्ष्मी—टिळक रोड. पूना कॅफे—जंगली महाराज रोड. ईमॉरेटर—ईस्ट स्ट्रीट, पुणें २. पूना हॉटेल—लष्कर.

(१८) **स्पोर्ट डेपोजः**—कुकरेजा लिमिटेड, २९८ म. गांधी रोड. पूना स्पोर्ट्स् ॲन्ड जनरल स्टोअर्स, तुळशीबाग, पुणें २.

(१९) **फर्निचर मेकर्स ॲन्ड डीलर्सः**—ईलाईट फर्निचर ४७९।३ सदाशिव, पुणें २. के. एम्. बेलसरे, सदाशिव पेठ, पुणें २. शंकर रामचंद्र आणि कंपनी, १२८ म. गांधी रोड.

(२०) **पेंन्टर्सः**—पेन्टर ए. जी. वेडेकर, बुधवार चौक, पुणें २. पेन्टर एस्. करी, ६९९ शुक्रवार पुणें २. अरौझ दस्तुर मेहर रोड, कँप. पेन्टर पुराणिक, सदाशिव पुणें २.

क्र. नं. ९२-५१९८

प्रश्न

(१) मेवामिठाई कोठें खावी ?
(२) सायकली कोठें खरेदी कराल ?
(३) खेळण्याचें सामान कोठें मिळतें ?
(४) प्रसिद्ध पेंटर्स कोण आहेत ?
(५) प्रसिद्ध उपाहार-गृहें सांगा.

---

## पाठ १४ वा

# कोठें काय मिळतें ?

(२१) **वॉशर्स डायर्स अॅन्ड ड्रायक्लीनर्सः**—पर्ल वॉशिंग कंपनी, २९५ सोमवार, पुणें २. मनोहर लॉन्ड्री ६२० सदाशिव, भिकारदास मारुती रोड, पुणें २. वॉशिंग एंपोरियम, मेहुणपुरा कोपरा, शनिवार, पुणें २. श्रीवॉशिंग कंपनी, शनिवार गेटाजवळ, पुणें २. निर्मलकेंद्र, टिळक रोड, पुणें २. पायोनियर डाइंग हाऊस, लक्ष्मीरोड, गोखलेहॉल.


(२२) **मशिनरी विक्रेतेः**—केळकर ब्रदर्स, बुधवार चौक, पुणें २. हॉलवर्ड एंजिनियर्स, सरस्वती विलास, लक्ष्मीरोड पुणें २.

(२३) **मशिनरी व सुटे भाग तयार करणारः**—जेकॉप एंजिनियर्स, देशमुखवाडी, पुणें २. वेस्टर्न एंजिनियरिंग कंपनी, ६५२ शुक्रवार, पुणें २.

(२४) **साबणाचे कारखानदारः**—पूना सोप फॅक्टरी, १२९ भवानी पेठ. कॉसमॉस प्रॉडक्टस्, डेक्कन जिमखाना.

(२५) **फोटोग्राफरः**—दीक्षित फोटो स्टुडिओ, टिळक रोड, पुणें २. स्वस्तिक फोटो स्टुडिओ, ७२८ बुधवार. स्टुडिओ इंटर-नॅशनल, ३७ म. गांधी रोड, पुणें १.

(२६) **फोटोग्राफिक डीलर्स:**—टी कृष्ण आणि कंपनी लक्ष्मी रोड, पुणें २. के. के. ॲन्ड कंपनी ईस्ट स्ट्रीट.




(२७) **लुगडी, पातळांचे घाऊक व्यापारी व कारखानदार:**—डी. चंद्रकांत आणि कंपनी, १७५ बुधवार. धोंडीराम दलिचंद खिवसरा, २११ रविवार.

(२८) **कापडाचे व्यापारी:**—गजानन क्लॉथ स्टोअर्स, लक्ष्मी रोड, पुणें २. गोरे आणि मंडळी, फुले मार्केट रोड, पुणें २. धनजीभाई अमीचंद, महात्मा गांधी रोड, कँप.

(२९) **खादी भांडारें:**—काँग्रेस खादी भांडार, बुधवार चौक. जय हिंद खादी भांडार ४२१ बुधवार पेठ. खादी वस्त्र भांडार, महाराष्ट्र बँकेसमोर, लक्ष्मी रोड.

(३०) **होलसेल किराणा व्यापारी:**—विठ्ठलदास साखळचंद रविवार, पुणें २. दाऊदभाई एच् जिना ॲन्ड को., ५४ साचापीर स्ट्रीट, पुणें १.

(३१) **किराणा मालाचे विक्रेते**:—साठे आणि मंडळी, शनिवार. शंकर वामन साने, चिमण्या गणपती. गांधी ककुचंद वेणीचंद, रविवार, पुणें २.

(३२) **रेडियो व ग्रामोफोन डीलर्स**:—बी. टी. दाते ॲन्ड को. २७० बुधवार. डायमंड वॉच कंपनी, तुळशीबाग रोड, पुणें २. महाराष्ट्र कॉर्पोरेशन ४५४ बुधवार, पुणें २. के. एस्. घोरपडे, ६८७ बुधवार, पुणें २.

(३३) **पुस्तक-विक्रेते**:—व्हीनस बुक स्टॉल, अप्पा बळवंत चौक, पुणें २. न्यू किताबखाना, बुधवार चौक. नेर्लेकर बुकसेलर्स, बुधवार चौक. डेक्कन बुक स्टॉल, डेक्कन जिमखाना, पुणें २. रॉयल बुक स्टॉल, अप्पा बळवंत चौक, पुणें २.

(३४) **पुस्तक-प्रकाशक** —देशमुख आणि कंपनी, १९१ शनिवार पेठ. व्हीनस बुक स्टॉल, अप्पा बळवंत चौक. प्रल्हाद प्रकाशन मंदिर, १२३ शुक्रवार पुणें २.

(३५) **घड्याळें दुरुस्त करणारे व विक्रेते**:—प्रकाश वॉच कंपनी, म्युनिसिपालिटी समोर, पुणें २. बुडेर वॉच कंपनी, ६१ म.गांधी रोड पुणें १. डायमंड वॉच कंपनी, तुळशीबाग रस्ता, पुणें २.

(३६) **चष्म्यांचे व्यापारी**:—व्ही.के. अभ्यंकर आणि सन्स, बुधवार चौक. ए दिनशा ॲन्ड कंपनी, म. गांधी रोड, पुणें १.

(३७) **ऑटो रिपेअर्स**:—आदर्श मोटार वर्क्स्, टिळक रोड, लकडी पूल. विजय मेटल इंडस्ट्रीज, ५४३ शिवाजीनगर.

(३८) **छत्र्या व ट्रंका**:—गुजराथ ट्रंक फॅक्टरी, ४९३ बुधवार. शांतिलाल ॲन्ड ब्रदर्स, ७९४ सदाशिव, पुणें २.

(३९) **केमिस्ट आणि ड्रगिस्टः**—आयसेन फार्माटिकल कंपनी, ३९ बुधवार, पुणें २.

(४०) **तेलाच्या गिरण्याः**—हिंद ऑईल मिल्स, सोमवार, पुणें २.

(४१) **तपकिरीचे कारखानदारः**—वर्तकी तपकिरीचा कारखाना, ५२० शनवार, पुणें २.

(४२) **औषधाचीं दुकानें**:—ओरिएन्टल फार्मसी, वेलबाग चौक. सोराबजी होरमसजी, म. गांधी रोड.

(४३) **वैद्यकीय उपकरणीं**:—सुरेश ट्रेडर्स, ८८ नारायण, पुणें २.

(४४) **चहाचे व्यापारी**:—पूना टी डेपो, २४० बुधवार, पुणें २.

(४५) **विड्यांचे कारखानदारः**—मानूरकर विडी वर्क्स्, भवानी पेठ, पुणें २.

(४६) **खतांचे कारखानदारः**—पूना केमिकल अॅन्ड फर्टिलायझर्स कंपनी, २९५ नारायण पेठ.

## प्रश्न

(१) प्रसिद्ध वार्शिंग कंपन्यांचीं नांवें द्या.
(२) फोटो कोठें काढाल ?
(३) कापड कोठें खरेदी करावें ?
(४) पुस्तक-प्रकाशक कोण आहेत ?
(५) खतें कोठें खरेदी कराल ?

५५३

## पाठ १५ वा
# पुण्यांतले कांहीं व्यवसायी

**हाडे बसविणारे व चोळणारे:**—रामकृष्ण विष्णु आगाशे, १००५ सदाशिव, पुणें २. के.जे.फेनीवाला, म.गांधी व सिटीपोस्ट रोड.

**प्रसिद्ध डॉक्टर्स:**—डॉ० भरूचा, के. एच्. सेठना बिल्डिंग्ज, वेस्ट स्ट्रीट, कँप. डॉ० कोयाजी, म. गांधी रोड. डॉ० ढमढेरे, पेरू गेटाजवळ, पुणें २.

**मोटार कोठें शिकाल ?:**—कुलकर्णी मोटार स्कूल, शनवार वाड्यासमोर, पुणें २.

**बिल्डिंग कॉंट्रॅक्टर:**—अबदुल्ला इब्राहिम, २९१ म. गांधीरोड, पुणें १. गोविंद मोती अँन्ड कंपनी, ससून रोड पुणें १.

**दंतवैद्य:**—डॉ० जोशी, पॅरेमाऊंट टॉकीज, बुधवार चौक, पुणें २. डॉ० भरूचा, एलफिन्स्टन रोड, पुणें १. डॉ० किनरे, रविवार, पुणें २.

**ऑडिटर्स अँन्ड अकौन्टन्टस्:**—जी.एम्.ओक, १८० बुधवार, पुणें २. व्ही. बी. कीर्तने, लक्ष्मी रोड, पुणें २.

**ब्लॉक मेकर्स:**—के.जोशी अँन्ड कंपनी, देशमुखवाडी, सदाशिव पेठ. भिडे ब्लॉक मेकर्स, लक्ष्मी रोड.

**मांडवाचे कंत्राटदार:**—एस्.जी. गोखले अँन्ड को. नातुबाग, सदाशिव पेठ. लिमये मांडववाले, ३७० नारायण.

**शिल्पकार:**—जगताप आर्ट स्टुडिओ, ३८ नागेश, पुणें २.

**सुताच्या व कापडाच्या गिरण्या:**—दि राजाबहादूर मिल्स पुणें १.

**पाकिटें, लखोटे व फायली:**—सावळे आणि कंपनी, पुरंदरे कॉलनी, पुणें २.

**प्रमुख वकील:**—श्री. वि. गाडगीळ, ८१ सदाशिव, पुणें २. ब. ना. भिडे, शेवड्यांचा बोळ, सदाशिव पेठ. निरगुडकर वकील, ५९२ बुधवार.

**छापखाने:**—आर्यभूषण छापखाना, डेक्कन जिमखाना. चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ. शशिकांत प्रिंटिंग प्रेस, शनवार पेठ.

**सराफ:**—कन्हय्यालाल पुरुषोत्तमदास, लक्ष्मी रोड, पुणें २. एन्. रुस्तुमजी अर्सेनल रोड, पुणें २.

**फौंटनपेनचे व्यापारी:**—काळे ब्रदर्स, बुधवार चौक, पुणें २.

(१) **ब्लॉक मेकर्स**—जी. एस्. मोघे ॲन्ड सन्स, जोगेश्वरी-समोर, पुणें.

(२) **टेलर्स ॲन्ड औटफिटर्स**—आर्. एन्. पराडकर ॲन्ड सन्स, सिटी पोष्ट ऑफिससमोर.

(३) **'राजा सायंटिफिक ॲपरेटस्'**—३५२ शुक्रवार पेठ, पुणें २.

ह्या कारखान्यामध्यें कांचेचीं शास्त्रीय उपकरणीं बनविण्यांत येतात. हें काम अत्यंत काळजीपूर्वक करावें लागतें. हीं उपकरणीं बनविणें हें अत्यंत कौशल्याचें काम असून अशा प्रकारचा कारखाना पुण्यामध्यें एकच आहे. प्रत्येक नग हा स्वतंत्रपणेंच हाताळावा लागतो. यंत्रांनीं (Mass Production) अधिक मोठ्या प्रमाणावर एका वेळेस जास्त नग होऊं शकत नाहीं. ह्या कारखान्याचे चालक

श्री. डी. टी. वैद्य हे होत. कारखाना कोणत्याही वेळीं मोठ्या आनंदानें ते दाखवितात.

(४) **ईस्टर्न इंजिनियर्स युनियन**—कॉमनवेल्थसमोर लक्ष्मी रोड, पुणें २. शेतकी विषयक यंत्राचे व्यापारी; तसेंच यंत्राचे सुटे भागही मिळतात.

**स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि. पुणें ३**—पुण्यांत जे थोडेसे कारखाने आहेत, त्यांत रबर प्रॉडक्टस् हा एक मोठा व जुना कारखाना आहे. "स्वस्तिक"चे फुगे तुम्हांला माहीतच आहेत. आतां निरनिराळीं रबरी चित्रें, रबरी चेंडू वगैरे खेळणीहि "स्वस्तिक" मध्यें तयार होतात. याशिवाय मोटारींचे निरनिराळे रबरी पार्ट्स्, रबरी दोरा, रबरी हातमोजे इ. अनेक प्रकारच्या रबरी वस्तू या कारखान्यांत तयार होतात. या कारखान्याचे चालक (मॅनेजिंग एजंटस्) मे. वैद्यबंधू हे आहेत. कारखान्याची स्वतःची भव्य इमारत खडकी स्टेशनसमोरच असून त्यांत आधुनिक अशी मशीनरी बसवलेली आहे.

**प्रश्न**

(१) हाडें चोळावयास कोठें जावें ?
(२) प्रसिद्ध डॉक्टरांचीं नांवें सांगा.
(३) कंत्राटदार कोण ?
(४) प्रमुख वकील कोण आहेत ?
(५) फौंटनपेन कोठें खरेदी कराल ?

## पाठ १६ वा

# विविध माहिती

**पुण्यांत चित्रपट कंपन्या कोणत्या आहेत ? :**—(१) नवयुग चित्रपट कंपनी लि., शंकरशेट रोड, पुणें २. (२) माणिक स्टुडिओज, शंकरशेट रोड, पुणें २. (३) प्रभात फिल्म कंपनी, प्रभात नगर, पुणें २. (४) अशोक पिक्चर्स, टिळक रोड, पुणें २.

**पुण्यांत सिनेमाचीं थिएटर्स किती आहेत ? शहरांतील:**—(१) प्रभात (२) पॅरेमाऊंट (३) वसंत (४) विजयानंद (५) आर्यन (६) अलका (७) हिंदविजय (८) दिलखुश (९) अपोलो (१०) डेक्कन (११) विजय (१२) भानुविलास ( येथें नाटकेंहि होतात ) (१३) आर्यभूषण ( तमाशागृह ) (१४) मिनर्व्हा (१५) ग्लोब (१६) श्रीकृष्ण.

**लष्करांतील:**—(१) वेस्ट एंड (२) कॅपिटॉल (३) एंपायर (४) अशोक (५) रेक्स (६) माया (७) एक्सेलशियर.

आग लागली असतां टेलिफोन **करून बंब बोलवावे** लागतात पण त्यांचे नंबर माहिती पाहिजेत ना ?

| | | |
|---|---|---|
| बुधवार पेठेंतील बंब | टे. नंबर | २५३२ |
| भवानी पेठ | ,, | २८९० |
| कँटोनमेंट | ,, | २०५३ |
| फायर सुपरिटेंडेंट | ,, | ३१८७ |
| सबर्बन | ,, | २१०५ |

**पुण्यांतील पोस्ट विभाग:**—जनरल पोस्ट ऑफिस, कँप पुणें नंबर १. सिटी पोस्ट ऑफिस लक्ष्मी रोड, पुणें नंबर २. खडकी

पोस्ट ऑफिस, पुणें नंबर ३. डेक्कन जिमखाना, पुणें नंबर ४. शिवाजी नगर, पुणें नंबर ५. येरवडा पोस्ट ऑफिस, पुणें नंबर ६.

**पुण्यांतील दैनिकें कोणतीं व त्यांचे संपादक कोण ? :—** (१) काळ—शं. रा. दाते, (२) प्रभात—वा. हि. कोठारी, (३) भारत—व. प्र. गीत, (४) सकाळ—ना. भि. परुळेकर, (५) मन्वन्तर—कोकाटे, (६) लोकराज्य—वि. वि. बापट, (७) लोकशक्ति—न. वा. लिमये.

**साप्ताहिकें:—**(१) केसरी—( आठवडयांतून तीन वेळां ) ज. श्री. टिळक, (२) मराठा— श्री. दिवेकर, (३) जनवाणी—ना. ग. गोरे, (४) जनसत्ता—श. शां. मोरे, (५) अर्थ—श्री. काळे, (६) झंकार—वि. श्री. मोडक, (७) युगांतर—हेमंत खरे, (८) दीनबंधु—प्र. वि. नवले, (९) स्वराज्य—ज. दि. थिटे, (१०) तरुण महाराष्ट्र—मानकर.

**मासिकें:—**(१) शालापत्रक—दा. पां. रानडे, (२) आनंद—गो. ग. तळवळकर, (३) वाङ्मय शोभा—म. म. केळकर, (४) महाराष्ट्र, (५) माधुरी—श्री. अंबिके, (६) सह्याद्रि—दि. वि. काळे, (७) महात्मा—दा. न. शिखरे, (८) रोहिणी—वसंत काणे, (९) संपदा—आ. रा. भट, (१०) आपली शेती—जी. अनन्तन्, (११) एकता—ल. ना. गोखले, (१२) ध्रुव—स. प्र. कानिटकर, (१३) प्रसाद—शं. वा. दांडेकर, य. गो. जोशी, (१४) पराग—ग. ना. जोशी, य. न. केळकर.

**त्रैमासिकें:—**(१) नवा महाराष्ट्र (२) ज्ञानेश्वर (३) साहित्य पत्रिका.

**पुण्यांतील कांहीं वाचनालयें:—**(१) नगर वाचन मंदिर—

हें लक्ष्मी रोडवर असून १०० वर्षांहून जुनें आहे. पुण्यांतील लोकांचें हें आवडतें वाचन-मंदिर आहे. सर्व प्रकारच्या पुस्तकांनीं व मासिकांनीं हें सुसज्ज आहे. (२) मुक्तद्वार वाचनालय—गोखले स्मारक मंदिर. (३) किताब मिनार वाचनालय—तुळशीबाग रोड. (४) मनोहर वाचनालय—टिळक रोड.

पुण्यांतील सरकारी ऑफिसांसाठीं **सेंट्रल बिल्डिंग** ही सरकारी इमारत ससून हॉस्पिटलशेजारीं आहे. इमारत भव्य आहे. त्या इमारतीच्या आसपासच इतर सरकारी कचेऱ्या आहेत.

**औंध येथील औद्योगिक शाळा:**—जनतेला औद्योगिक शिक्षण देण्यासाठीं पुण्यापासून ४ मैलांवर औंध येथें सरकारनें ही शाळा काढली आहे. शिक्षण मोफत आहे. वसची सोय आहे. विद्यार्थ्यांनीं याचा फायदा ध्यावा.

**खडकवासला येथील मिलिटरी ॲकेडेमी:**—विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण देऊन उत्तम सैनिक करण्यासाठीं खडकवासला येथें लष्करी कॉलेज उघडण्यांत येत आहे. भारताचे मुख्य प्रधान पंडित नेहरु यांच्या हस्तें कोनशिला-समारंभ झाला. भारतांतून ठिक-ठिकाणचे विद्यार्थी या ठिकाणीं शिक्षणास येणार आहेत ! महाराष्ट्रीय तरुणांना ही संधि चांगली आहे !

**प्रश्न**

(१) पुण्यांतील चित्रपट कंपन्या सांगा.
(२) पुण्यांतील १० थिएटरांचीं नांवें द्या.
(३) लष्करांत कोणतीं थिएटरें आहेत ?
(४) "पुण्यांतील दैनिकें" यावर १५ ओळी लिहा.
(५) टीपा लिहा:
केसरी, सकाळ, सिटी पोस्ट, जनवाणी, लोकशक्ति.
(६) महाराष्ट्रीय तरुणांना कोणती संधि चांगली आहे ?

## पाठ १७ वा

# पुण्यांतील कांहीं नाणावलेल्या व्यक्ति




(१) **लोकमान्य टिळकः**—भारताला स्वराज्याचा गुरुमंत्र यांनीं दिला. यांना 'हिंदी असंतोषाचे जनक' म्हणतात. आपल्या राजकारणाची पुण्यांत त्यांनीं मुहूर्तमेढ रोवली.

(२) **विष्णुशास्त्री चिपळूणकर:**—इंग्रजांच्या राज्यामुळें लोक स्वाभिमान विसरले. शास्त्रीबुवांनीं आपल्या निबंधमालेनें लोकांत जागृति केली ! मराठी भाषेची त्यांनीं फार सेवा केली. त्यांस मराठी भाषेचे शिवाजी म्हणतात. चित्रशाळा, किताबखाना, न्यू इंग्लिश स्कूल हीं यांच्या कार्यांचीं बोलतीं स्मारकें आहेत.

**(३) सुधारक आगरकरः**—समाजानें वाईट चालीरीति व



रूढी सोडून द्याव्या व सुधारणा करावी असा त्यांनीं आग्रह धरला ! त्या काळच्या समाजानें त्यांना फार त्रास दिला. पण आज आपणास त्या सुधारणा झालेल्या दिसत आहेत. स्त्रीशिक्षण, विधवा-विवाह, बाल-विवाहबंदी यांसारखे कठीण सामाजिक प्रश्न त्यांनीं हाताळले.

**(४) न्यायमूर्ति रानडेः**—समाज थंड गोळ्यासारखा पडला होता, अशा वेळीं रानड्यांनीं समाजास विचार करावयास शिकविलें. समाजाच्या गाऱ्हाण्यांची दाद सरकार दरबारीं लावली !



(५) **लोकहितवादी**:—गोपाळराव देशमुख हे सुधारक होते. लोकांच्या मूर्ख रूढीवर कोरडे ओढून त्यांनीं समाज-जागृति केली.

(६) **ज्योतिबा फुले**:—महाराष्ट्रांतल्या अडाणी समाजाला आपल्या हक्काची जाणीव व्हावी म्हणून लोकशिक्षणाचें काम त्यांनीं हातीं घेतलें व यशस्वी करून दाखविलें.

(७) **नामदार गोखले**:—सनदशीर राजकारणी म्हणून अखिल भारतांत यांनीं नांव कमाविलें ! महात्मा गांधी यांना आपले गुरु मानीत. यांचें वक्तृत्व व विद्याव्यासंग दांडगा होता. इंग्लंडांतहि यांची वाहवा झाली.

(८) **डॉ० भांडारकर**:—संस्कृतचे अत्यंत व्यासंगी होते. संस्कृत वाङमय जमा करून त्यांनीं पुण्यांत आणून ठेवलें. भांडारकर इन्स्टिटयूट हें त्यांचें बोलकें स्मारक आहे.

(९) **ल. ब. भोपटकर**:—पुण्यांतील प्रसिद्ध वकील असून पहिल्या प्रतीच्या देशभक्तांत यांची गणना होते. महासभेच्या कार्याला यांनीं स्वतःस वाहून घेतलें आहे.

(१०) **दत्तोपंत पोतदार**:—यांचा इतिहासव्यासंग दांडगा असून पुण्यांतील नावाजलेले इतिहासाचार्य विद्वान आहेत. महामहोपाध्याय अशी त्यांची गौरवयुक्त पदवी आहे.

(११) **दत्तोपंत आपटे**:—इंग्रजाची नोकरी करावयाची नाहीं ही प्रतिज्ञा घेऊन यांनीं इतिहासाची सेवा करण्यांत आयुष्य वेंचलें.

(१२) **श्री. म. माटे**:—अस्पृश्यांची सेवा करण्यामध्यें यांनीं बरेंच आयुष्य घालविलें. हे प्राध्यापक होते. उत्तम साहित्यिक म्हणून यांची ख्याति आहे.

(१३) **प्रो. नारळकर**:—आपल्या चतुरस्र बुद्धीनें यांनीं नू. म. वि. या शाळेची महाराष्ट्रभर कीर्ति पसरविली. शिक्षणक्षेत्रांत नवीन दालन निर्माण केलें. त्यांचें नांव सर्व शिक्षणप्रेमीयांच्या तोंडीं आहे.



**(१४) वा.ग.जगताप:**— बहुजन समाजाला शिक्षण देऊन प्रगतिपथावर आणण्या-साठीं यांनीं फार परिश्रम घेतले आहेत.



**(१५) नामदार गाड-गीळ:**——काँग्रेसची सेवा करण्यांत यांनीं आपलें आयुष्य घालविलें. भारत सरकारचे भूतपूर्व वीज व खाणकाम मंत्रि.



(१६) प्रो. देवधरः—महाराष्ट्राचे ख्यातनाम क्रिकेटपटु. परदेशांतहि यांच्या खेळाबद्दल प्रशंसा झाली. पुण्यांतील तरुणांना क्रिकेटचें शिक्षण देऊन भारतीय कीर्तीचे हजारे, सोहनी, भांडारकर यांसारखे क्रिकेटपटु निर्माण केले.



(१७) दे. भ. केशवराव जेधेः—प्रथम यांनी ब्राह्मणेतर चळवळींत नांव कमाविलें. पुढें कॉंग्रेसची सेवा करून ते महाराष्ट्र प्रांतिकचे अध्यक्ष झाले. हल्लीं शेतकरी कामकरी पक्षाचे एक आधारस्तंभ आहेत.

(१८) दे. भ. बापुसाहेब गुप्तेः—हे वकील असून कॉंग्रेसची बहुमोल सेवा यांनीं केली आहे.




(१९) दे. भ. शंकरराव देव:——महाराष्ट्रांतील प्रसिद्ध कॉंग्रेससेवक. यांनीं देशासाठीं फकिरी पत्करली असून सर्व जीवन देशसेवेंत घालविण्याची प्रतिज्ञा केली आहे.



(२०) महर्षि अण्णासाहेब:——जुन्या काळीं अत्यंत कठीण असलेलें स्त्रीशिक्षणाचें व्रत यांनीं घेतलें व हिंगणें येथें गरीब, अनाथ स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केली! यांचा कार्याचा इतका व्याप वाढला कीं स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करावें लागलें! हिंगण्याचा आश्रम हें यांच्या कार्याचें बोलतें प्रतीक आहे. यांचें वय "९४" आहे.

(२१) **शं. शा. मोरे:**—हे पुण्यांतील ख्यातनामक वकील असून ब्राह्मणेतर चळवळींत पुढें आले. कॉंग्रेसमध्यें कांहीं वर्षें होते. हल्लीं शेतकरी कामकारी पक्षाचे आधारस्तंभ आहेत. जनसत्ता हें साप्ताहिक काढतात.

(२२) **धनंजयराव गाडगीळ**:—अर्थशास्त्रांत भारतांत यांचा हात धरणारा दुसरा कोणी नाहीं. यूनोच्या अर्थशास्त्र समितीचे ते सभासद आहेत. पुण्यांतील विद्यापीठांत प्राध्यापक आहेत.



(२३) **डॉ० र. पु. परांजपे**:—गणितांतील अत्युच्च अशी रँगलर ही परीक्षा ते उत्तीर्ण झाले. भारतांतील ते पहिले रँग्लर! त्या वेळीं ते पहिले आले. मानाची भली मोठी सरकारी नोकरी न पत्करतां यांनीं पुण्यांतच फर्ग्युसन कॉलेजांत स्वराष्ट्र प्रेमानें सेवा केली. ऑस्ट्रेलियांत भारताचे हायकमिशनर म्हणून गेले होते! नानाविध क्षेत्रांत यांचा हातभार असतो.

(२४) **ना. ग. गोरे:**—हे समाजवादी पक्षाचे एक प्रसिद्ध कार्यकर्ते आहेत. कॉंग्रेसच्या चळवळींत यांनीं तुरुंगवास पत्करला.

(२५) **सौ. सुमतीबाई गोरे**:—या ना. ग. गोरे यांच्या पत्नी. शिक्षणकार्याची विशेष आवड आहे. मुंबई विधिमंडळाच्या स्त्रियांसाठीं असलेल्या राखीव जागेवर निवडून आल्या.

(२६) **श्री. पोपटलाल शहा**:—काँग्रेसच्या सत्याग्रहांत तुरुंगवास पत्करला. हे काँग्रेसचे एकनिष्ठ कार्यकर्ते आहेत.

(२७) **स. गो. बर्वे**:—आपल्या दोन तीन वर्षांच्या कारकीर्दींत अलोट लोकप्रियता मिळविणारे श्री. बर्वे हे पुण्याचे भूतपूर्व कमिशनर. पुण्याचा रंग त्यांनीं अगदीं पालटवून टाकला. रस्ते, मार्केटस्, घरें यांच्या बाबतींत त्यांनीं जातीनें लक्ष घातलें. जनतेच्या सुखासाठीं निरनिराळया सोई करण्याकडे त्यांचें सारखें लक्ष होतें. त्यांचा उत्साह आणि कार्य करण्याचें कौशल्य दांडगें आहे.



### प्रश्न


(१) टीपा लिहा.हिंदी असंतोषाचे जनक; न्यायमूर्ति रानडे; लोकहितवादी.
(२) ज्योतिबा फुले कोण ? त्यांचें काय सांगा.
(३) पोतदार कशासाठीं प्रसिद्ध आहेत ?
(४) प्रो. नारळकरांचें कार्य सांगा.
(५) धनंजयराव गाडगीळ,रँगलर परांजपे,महर्षि कर्वे यांचा परिचय करून द्या.

## पाठ १८ वा

# पुण्यांतील लोक

मुलांनो, पुण्यांतील निरनिराळ्या गोष्टींची तुम्हांस माहिती झालेली आहे. आतां पुण्यांतील लोक कसे काय आहेत तें आपण पाहूं.

पुणें हें शिक्षणाचें माहेरघर आहे. त्यामुळें येथें शिक्षणाचें प्रमाण अधिक आहे. बी. ए., एम्. ए. झालेले लोक घरोघरीं देखील सांपडतील. पुण्यांत पहिलवानी पेशाचे लोक आहेत. पुण्यांत पहाटें




तालमी घुमत असतात. मोठमोठ्या निकाली कुस्त्या होतात. पुणें तसें भाविक आहे. ज्ञानबा-तुकारामांच्या पालख्यांच्या मिरवणुकींत हजारोंनीं सामील होतात. पुण्यांत कीर्तनकारांना चांगला वाव आहे. गुणी लोकांची पारख करून त्यांचा गौरव करण्यांत पुणें शहराचा लौकिक आहे. 'पुण्यांत ज्यानें सभा जिंकली त्यानें सर्व जिंकलें'

असें म्हणतात. पुण्यांतील लोक रसिक आहेत. ते गाणीं ऐकत तास तास बसतील! क्रिकेटच्या व हुतुतूच्या मॅचेस पाहतील! इंग्रजी सिनेमा पाहण्याचा सुशिक्षितांना षोक आहे!

पुण्यांत असे लोक आहेत कीं, त्यांच्या वेषावरून तुम्हांला त्यांची पारख होणार नाहीं. एकादा एम्. ए. गृहस्थ तुम्हांला अगदीं चामट व घामट कपडयांत दिसेल! तर इंग्रजीचा गंध नसलेला अगदीं एम्. ए.ची ऐट आणणारा अद्ययावत् कपडे घालून तुम्हांला चकवील! पुण्यांतील मुली फॅशन करण्यांत पुढारलेल्या आहेत. धीट आहेत. त्या सायकलींवर बसतात. सभाव्याख्यानांत बोलतात, निरनिराळे व्यवसाय करतात! पुण्यांतील मुलें मोठीं चलाख व चुणचुणीत म्हणून प्रसिद्ध आहेत. सायंकाळीं हीं मुलें मैदानांत नियमितपणें खेळावयास जातात. व्यायामाची त्यांना आवड आहे. पण पुण्यांतील मुलें मराठीच्या अभिमानामुळें इंग्रजी संभाषण करीत नाहींत. इंग्रजीची संवय करण्यासाठीं मुलांनीं इंग्रजी बोलावयास शिकलें पाहिजे! पुण्यांत शिक्षण अगदीं स्वस्तांत मिळूं शकतें. दूरदूरचे महाराष्ट्रीय लोक येथून शिकून जातात!

आपलें पुणें म्हणजे गुणाचें आगर! गरीब व होतकरू लोकांना तें आश्रय देतें! पुण्यांत देशाभिमानी लोक पुष्कळ आहेत! आपल्या इतिहासाचा पुणेकरांना अभिमान आहे! पुणेकर झाल्याबद्दल तुम्हांलाहि अभिमान वाटतो ना?

**प्रश्न**

(१) पुण्याची प्रसिद्धि कशासाठीं आहे?
(२) वेषावरून पारख कां होणार नाहीं?
(३) "पुण्यांतील मुली" यावर १० ओळी लिहा.
(४) पुणें शहराचा लौकिक कसा आहे?

सं. नं.

## पाठ १८ वा

# लोक-शिक्षण


नागरिकांना विविध माहिती देऊन त्यांच्या सामान्य ज्ञानांत भर टाकण्याचें महत्त्वाचें काम आहे. आपले नागरिक हे त्या दृष्टीनें पुष्कळच अज्ञानांत आहेत. एकतर शिक्षणाचा प्रसार बहुजनसमाजांत म्हणावा तसा नाहीं. दुसरी गोष्ट लोकांना त्या दृष्टीनें पाहण्याची संवय नाहीं. शहरांतल्या पाहण्यासारख्या गोष्टी देखील नागरिकांना ठाऊक नसतात.

सिनेमा हें लोक-शिक्षणाचें एक प्रभावी साधन आहे. गेल्या महायुद्धापासून लोकांना निरनिराळी माहिती व्हावी म्हणून हिंदुस्थान सरकारनें असे 'वार्तापट' काढण्यास सुरवात केलेली आहेच! हे 'वार्तापट' जनतेला दाखविण्याची सक्ति थिएटर-चालकांवर आहे. अशाच तऱ्हेचा 'वार्तापट' दाखविण्याचा उपक्रम पुणें महापालिकेनें सुरू केला आहे. श्री. पु. रा. भिडे यांच्या 'टॉपिक कॉर्पोरेशन' या संस्थेच्या सहकार्यानें हे वार्तापट कार्पोरेशनच्या नव्या व विशाल उद्यानांत दाखविण्याचा कार्यक्रम गेल्या मार्च महिन्यापासून सुरू झालेला आहे. दिवसभर श्रम केल्यावर विरंगुळा वाटावा म्हणून मोकळ्या हवेंत फिरावयास येणाऱ्या नागरिकांचें 'मनोरंजन व शिक्षण' असा दुहेरी कार्यक्रम आहे हा! साधारण काळोख पडल्यावर हे वार्तापट दाखविण्यांत येतात. शनिवारीं सोमवार पेठ उद्यानांत आणि रविवारीं पेशवे उद्यान व संभाजी उद्यान या ठिकाणीं हें लोकशिक्षणाचें काम चालतें! सध्यां ही योजना तीन महिन्यांपुरती असली तरी हा उपक्रम अभिनव आहे यांत शंका नाहीं.

---

## पाठ १९ वा

# " चला लोकहो, शहर पहा "





पुणें कॉर्पोरेशन झाल्यापासून पुण्यांतील ढिलाई व अव्यवस्था मागें पडली'आहे ! नागरिकांत एक नवीन चैतन्य निर्माण झालें आहे ! उत्साह निर्माण झाला आहे ! ! कॉर्पोरेशननें नवीन नवीन कामें व योजना हातीं घेतल्या आहेत. या योजना आणि कामें नागरिकांना पाहतां यावीं यासाठीं देखील महापालिकेनें सोय केली आहे !

२७ जानेवारी १९५२ पासून महापालिकेनें नागरिकांना आपल्या सुधारणा दाखविण्यासाठीं विनामूल्य सोय केली आहे. कांहीं प्रतिष्ठित लोकांना मुद्दाम निमंत्रण देण्यांत येतें. तसेंच सर्व-सामान्य नागरिकांना देखील याचा फायदा मिळावा म्हणून नगर-पालिकेंत एक 'रजिष्टर बुक' ठेवलें आहे. ज्या नागरिकांना या सफरींत भाग घ्यावयाचा असेल त्यांनीं आपलीं नांवें रजिष्टरांत नोंद-वावयाचीं असतात. अशा लोकांसाठीं विश्रामबाग वाडयांतून दर

रविवारीं आठ वाजतां 'बसेस्' सुटतात. या शहरसफरींत खालील गोष्टी दाखविण्यांत येतात:——

(१) हायलेव्हल टँक, स्वारगेट. पुण्यांतील उंच उंच घरांत देखील पाणी चढावें यासाठीं ही मोठी टाकी उंचावर बांधली आहे. ती पाहण्यासारखी आहे !

(२) पेशवे उद्यान—पर्वतीजवळ ' सशाची बाग ' म्हणून एक आंबराई आहे. ती विशाल जागा कॉर्पोरेशननें घेतली असून त्या ठिकाणीं नवीन बाग करण्याचें काम चालू आहे. तेथील झाडांचा व टेकड्यांचा उपयोग करून घेण्यांत आला आहे. कांहीं प्राणी देखील बागेंत ठेवण्यांत आले आहेत ! समोरच पवित्र असें गणपतीचें स्थान आहे ! आणि हें शांत व रमणीय उद्यान ! ! दुधांत साखर टाकावी तसाच प्रकार !!! या उद्यानासमोर असलेल्या तलावाची भली मोठी जागा देखील साफ करण्याचें काम चालू आहे. क्रीडांगण व पोहण्याचा तलाव बांधण्यांत यावयाचा आहे. उंटावरून लहान मुलांना फिरविण्याची सोय आहे.



(३) आंबिल ओढा क्वार्टर्स—पुण्यांत जागेची फारच टंचाई भासत आहे ! लोकांना राहावयास जागा मिळत नाहीं ! ही अड-

चण लक्षांत घेऊन आंबिल ओढ्यानजीक कॉर्पोरेशननें चार मोठ्या दुमजली चाळी बांधल्या आहेत. सुमारें २५० बिऱ्हाडांची सोय होईल अशी व्यवस्था आहे ! भाडें देखील माफक ठेवण्यांत आलें आहे. १० ते १५ रुपये भाडें ही योजना कनिष्ठ वर्गाची राहण्याची सोय अल्प भाड्यांत करण्यासाठीं हातीं घेण्यांत आली. कार्पोरेशनच्या नोकरांनाच फक्त ह्या जागा देण्यांत येतात !

(४) लकडी पुलाची वाढ.

(५) सोमवार पेठेंतील पोहण्याचा तलाव:—हा नुकताच बांधलेला असून नागरिकांसाठीं नगरपालिकेचा असा हाच तलाव आहे.

(६) व्ही. डी. क्लीनिक.

या शिवाय कसबा पेठ वसाहत, दारुवालापूल शाळा, स्वारगेट पंप हाऊस, कोंढवा कसाईखाना, ह्या गोष्टी दाखविण्यासारख्या आहेत.

आतांपर्यंत एकूण आठ सफरी झाल्या असून त्यांत डॉक्टर, वकील, व्यापारी, इंजिनियर व इतर नागरिक अशा एकंदर ४४८ लोकांनीं भाग घेतला ! अर्थात् ही योजना नेहमीं चालूं ठेवणें शक्य नाहीं. पण शहराविषयीं जिज्ञासा व अभिमान निर्माण व्हावा म्हणून हा अभिनव उपक्रम सध्यां चालूं आहे.

### प्रश्न

(१) कॉर्पोरेशनमुळें काय झालें ?

(२) हायलेव्हल टँक कशासाठीं ?

(३) "पेशवे उद्यान"यावर १५ ओळी लिहा.

(४) "आंबिल ओढा कार्टर्स" कशासाठीं बांधल्या आहेत ?

## पाठ २० वा

# कॉर्पोरेशनचें दोन वर्षांतलें कार्य

( १ ) **डी. डी. टी. मोहीम**:—सबंध शहरांत आरोग्य नांदावें यासाठीं डांस, पिसवा, ढेकूण व इतर कृमिकीटकांविरुद्ध डी. डी. टी. ची मोहीम हातीं घेण्यांत आली. दर सहा महिन्यांनीं प्रत्येक घरांत डी. डी. टी. मोफत मारण्यांत येतें. त्यामुळें डांस, ढेकूण व झुरळें यांचा त्रास बराच कमी झाला असून सुरवातीला या ' उपद्-व्यापाला ' नांवें ठेवणारे अज्ञानी नागरिक आतां या योजनेचें कौतुक करतात ! !

( २ ) **आरोग्यविषयक इतर योजना**:—क्षयरोग-प्रतिबंधासाठीं बी. सी. जी. लस टोंचण्याची व्यवस्था, पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषाविरुद्ध ॲन्टी रॅबिक इन्जेक्शनची सोय, क्षयरोगावर उपचार करणारे दवाखाने, गुप्तरोगांवर गोरगरिबांना मोफत उपचार करतां यावेत यासाठीं व्हिनीरियल क्लिनिक, टाइफाईडवर गरिबांना क्लोरोमायसेटिनसारख्या महान् औषधाचा मोफत लाभ, रोगनिदानासाठीं डायग्नॉस्टिक लॅबोरेटरी, मातासंगोपन केंद्र, कुटुंब-नियोजन केंद्र इत्यादि उपयुक्त गोष्टी कॉर्पोरेशननें केल्या आहेत.

( ३ ) **नगरसुधारणा**:—गेलीं पंचवीस वर्षें कांसवाच्या गतीनें चाललेली नदीची सुधारणा-योजना त्वरेनें पूर्ण करण्यांत आली. पर्वतीतलाव बुजवून त्याला चांगलें स्वरूप देण्यांत येत आहे. रस्त्यावरील दिव्यांमध्यें वाढ करण्यांत आलेली आहे. मोठमोठ्या चौकांना मर्क्युरी दिवे लावलेले आहेत. निर्वासितांसाठीं नवीन दुकानें बांधून देण्यांत आलीं आहेत. गलिच्छ वस्तीची सुधारणा करण्यासाठीं

मंगळवार पेठ, कसबा पेठ, वडारवाडी वस्ती, आंबिल ओढा आणि गंजपेठ इतक्या ठिकाणीं कामें पुरीं करण्यांत आलीं आहेत. यांत कनिष्ठ वर्गाची बरीच सोय केलेली आहे.

पाण्याच्या व्यवस्थेसाठीं स्वारगेटला हायलेव्हल टँक बांधला आहे. फर्ग्युसन कॉलेजच्या मागील टेकडीवरील टांकी दुप्पट आकाराची केली आहे. त्यामुळें जिमखाना व येरंडवणा या भागांत नवीन वस्तीसाठीं भरपूर पाणी मिळण्याची व्यवस्था आहे.

(४) ड्रेनेज कामावर ४॥ लक्ष रुपये खर्चून ड्रेनेज लाईन्स वाढविण्यांत आल्या आहेत. शिवाय १३ संडास, २५ मुताऱ्या व १५० कचरा पेट्या नवीन बांधण्यांत आल्या आहेत. नागझरी व माणिक नाल्यांची सुधारणा करण्यांत आली आहे. अलीकडे कचरा वाहण्यासाठीं मोटारट्रकची सोय आहे. पूर्वींच्या डुलत जाणाऱ्या बैलगाड्यांना रजा देण्यांत आली आहे. कचरा देखील झटपट हालविण्याची दक्षता, करारी असे आरोग्याधिकारी श्री. अद्रानवाला हे घेत आहेत. त्यामुळें पुण्यांत दर वर्षी एकदां मुक्काम करणारा प्लेग अलीकडे २।३ वर्षांत आला नाहीं ! !

(५) फुले मार्केटवर १। लक्ष रुपये खर्च करून गाळे बांधले आहेत. मार्केटमधील बजबजपुरी व गबाळेपणा यांना हांकलून लावण्यांत आलें आहे. स्वच्छता व सफाई यांकडे बारकाईनें लक्ष पुरविलें आहे. याशिवाय ' शिवाजीनगर मार्केट ' ' कर्वेरोडमार्केट ' ' गणेश पेठ मच्छिमार्केट ' इतकीं नवीं मार्केट्स बांधलीं आहेत. आणखी एकदोन भाजी-बाजार बांधावयाचे आहेतच !

(६) दहा बारा प्राथमिक शाळा, शनिपाराजवळील इमारत, स्टोअर्स, छापखाना व जकात नाकीं अशीं इतर बांधकामें.

(७) दर वर्षी १३-१४ लक्ष रुपये खर्चून आतां सर्व रस्ते डांबरी केले आहेत. अनेक रस्ते रुंद करण्यांत आले आहेत.

(८) मनुष्य केवळ भाकरीवर जगत नाहीं. त्याला इतर गोष्टी, शिक्षण, भोंवतालची सौंदर्यपूर्ण परिस्थिति याची विकासासाठीं आवश्यकता असते; सत्यं, शिवं आणि सुंदरम् या साऱ्यांची आवश्यकता आहे. आणि म्हणूनच करमणुकीसाठीं एक लक्ष रुपये खर्चून प्रशस्त संभाजी उद्यान तयार झालें. आंतरराष्ट्रीय पोहण्याच्या शर्यती होण्याच्या मोजमापाचा अद्ययावत् तलाव बांधण्यांत आला !

(९) २२ लक्ष रुपये खर्चून पुणें म्युनिसिपल ट्रॅन्स्पोर्टची सोय करण्यांत आली आहे. वाहतुकीसाठीं बसेसची मोठ्या प्रमाणांत व्यवस्था झाली आहे.

## प्रश्न

(१) टीपा लिहाः—
डी. डी. टी. मोहीम, नगर-सुधारणा.

(२) मंडईची काय सुधारणा झाली ?

(३) 'म्युनिसिपल ट्रॅन्स्पोर्टची' व्यवस्था काय आहे ?

(४) आरोग्यविषयक काय योजना केल्या आहेत ?

पाठ २१ वा

# आणखी काय करणार बुवा ?

पुणें हें शिक्षणाचें माहेरघर आहे. पुणें ही राजधानी होतीच ! शिक्षणाचें पवित्र कार्य या शहरानें फार वर्षे केलें आहे, करीत आहे, आणि पुढेंहि करील ! पण पुण्याचा औद्योगिक विकास झालेला नाहीं. आधुनिक जगांत औद्योगिक उन्नतीला फारच महत्त्व आहे. आपला देश अद्याप औद्योगिक क्षेत्रांत मागें आहे. देश सुखी व संपन्न करावयाचा असेल तर उद्योगधंदे वाढले पाहिजेतच ! पुणें भारतांतलें एक प्रसिद्ध शहर ! तेव्हां त्यानें आपला वांटा नको का उचलावयाला ? या दृष्टीनेंच कार्पोरेशनची, एक हडपसर येथें करावयाची नवी योजना आहे. हडपसरला औद्योगिक वसाहतीसाठीं पाणी, वीज, इत्यादि सोयींनींयुक्त अशी स्वतंत्र ६०० एकर जागा योजण्यांत आली आहे. याचा पुण्याच्या औद्योगिक प्रगतीला मोठा उपयोग होईल !

सध्यांच्या दाट वस्तींतला लांकूड-बाजार अन्यत्र हालविण्याची योजना आहे. यांत व्यवस्थितपणा आणि आज अडून पडलेलीं राहतीं घरें वस्तीसाठीं मोकळी करणें असा दुहेरी फायदा आहे.

सध्यांच्या पेठांची व घर-नंबरांची परिस्थिति अत्यंत सदोष आणि घोटाळ्याची आहे. ती बदलून नवीन व्यवस्था करावयाची आहे.

मध्यम वर्ग हा समाजाच्या पाठीचा कणा आहे. या वर्गाची देखील जागेपायीं मोठी गैरसोय झाली आहे. कनिष्ठ वर्गाची सोय

करण्यांत आली आहेच. मध्यम वर्गासाठीं-'ग्रुप हाउसिंग योजना' आंखण्यांत येऊन घरांचा प्रश्न सोडविण्यांत येईल.

दूध हें महत्त्वाचें अन्न आहे. लहान मुलांच्या वाढीसाठीं तर दूध अगदीं उत्तम! तें गरीब लोकांना स्वस्त व सकस मिळावें म्हणून कार्पोरेशनची दूध-योजना आहे. ही दूध-पुरवठा-योजना सरकारमान्य झाली असून सरकारकडून कर्ज मिळतांच ती चालू होणार आहे.

तसेंच पुण्याची भावी वाढ पद्धतशीर व्हावी म्हणून 'मास्टर प्लॅन'ची आंखणी चाललेली आहे. ही आंखणी लवकरच पुरी होऊन ती लोकांना उपलब्ध होईल.

### प्रश्न

(१) आधुनिक जगांत कशाला महत्त्व आहे?
(२) 'औद्योगिक प्रगति व्हावी' यासाठीं काय योजना आहे?
(३) मध्यम वर्गाला कसली उपमा देतात? कां?
(४) मध्यम वर्गासाठीं काय करावयाचें आहे?
(५) 'मास्टर प्लॅन' म्हणजे काय?

## पाठ २२ रा

# कॉर्पोरेशनच्या सार्वजनिक निवडणुका

आपल्या देशांतल्या म्युनिसिपल निवडणुका म्हणजे ' बजबज-पुरी, वशिलेबाजी, सावळागोंधळ, लांड्यालबाड्या, लुच्चेगिरी, अशी व्याख्या होऊन बसलेली आहे; आणि असले प्रकार आपल्या अजाण जनतेंत होतात हेंहि खरें आहे. पुणें म्युनिसिपालिटी तरी त्याला अपवाद कां असावी ?

पुण्याला कॉर्पोरेशन झालें तेव्हां निवडणुकींत शक्य तितकी चोख व्यवस्था राहावी इकडे मे. कमिशनरसाहेब यांचें लक्ष होतें. निवडणूक निर्दोष व्हावी म्हणून मतदारांच्या याद्या गोळा करण्यापासून काळजी घेण्यांत आली. २१ वर्षें पूर्ण झालेल्या कोणत्याहि पुण्याच्या नागरिकास मतदानाचा हक्क दिला असल्यानें मतदारांची यादी बरीच वाढली. या प्रौढ मतदानपद्धतीमुळें गोंधळ माजूं नये अशी खबरदारी घेणें आवश्यक होतेंच.

मतदारांच्या याद्या घरोघर हिंडून करण्यांत आल्या. फॉर्मवर मतदाराचें वय, व्यवसाय व जन्मठिकाण इत्यादि टिपण्यांत आल्यानें तोतयेगिरीस आळा बसला.

प्रत्यक्ष मतदानासाठीं विशिष्ट पद्धतीचे सोईस्कर व स्वतंत्र असे मंडप घालण्यांत आले. त्यामुळें नागरिकांना मतदान करणें सोईचें झालें आणि तक्रारीला जागा राहिली नाहीं.

असेंब्ली निवडणुकीच्या वेळीं वापरण्यांत आलेली शाई बोटास लावण्यांत आली! तसेंच रेशन कार्ड दाखविण्याची सक्ति करण्यांत

आली त्यामुळें खोटया मतदानास आळा बसला! रेशनकार्डावर शिक्का मारण्यांत आला! ज्यांच्याजवळ कार्डें नाहींत अशा लोकांची गैरसोय होऊं नये म्हणून त्यांना तात्पुरते अधिकृत दाखले देण्यांत आले. अशा प्रकारचे लोक म्हणजे (१) मिलिटरी स्टँडवरून येणारे (२) परगांवीं जाऊन नुकतेच पुण्यांत आलेले पण याद्या करतेवेळीं पुण्यांत असलेले लोक होत. मयत मतदारांचीं नांवें मृत्यु-रजिस्टर पाहून कमी करण्यांत आलीं.

पक्षाच्या प्रचारास त्या दिवशीं बंदी करण्यांत आली. १०० यार्डांत तर प्रचारास सक्त बंधन घालण्यांत आलें, त्यामुळें गोंधळ माजला नाहीं.-पोलिसबंदोबस्त देखील उत्तम ठेवण्यांत आला. दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक मतदान-मंडपाजवळ वॉकी-टॉकी (Wireless) मशीन ठेवण्यांत आलें. एक मशीन विश्रामबाग वाडा येथें ठेवण्यांत आलें. त्यामुळें योग्य ती मदत केंद्रावर पोहोंचविणें सोईचें झालें. शहराचे चार झोन्स पाडले होते व प्रत्येकावर एक झोनल ऑफिसर होता. ही निवडणूक बरीचशी चोख झाली हें खरोखर भूषणावह आहे.

निवडणुकीसाठीं कॉर्पोरेशनचे एकूण २० वार्ड पाडण्यांत आले असून सर्व वार्ड मिळून सभासद ६५ आहेत. त्यासाठीं एकूण २६८ अर्ज आले होते. पैकीं ५७ उमेदवारांनीं उमेदवारी मागें घेतली. एक उमेदवार म्युनिसिपल कॉंट्रॅक्टर म्हणून त्याची उमेदवारी रद्द झाली. २१० उमेदवारांत चुरशीची निवडणूक झाली. एकूण मतदार २,०४, ६४७ होते. पैकीं १,०६, १७१ मतदारांनीं

मतदान केलें–६,३५९ मतपत्रिका रद्द झाल्या. टेंडर मतांची संख्या फक्त ७७ भरली. निवडणुका ४ मार्च व ६ मार्च १९५२ रोजीं झाल्या. ७ मार्चला मतमोजणी झाली. ७०० कारकून ही मोजणी करीत होते.

ही निवडणूक पुण्याच्या आजपर्यंतच्या निवडणुकींत सरस व चोख झाली ! कॉर्पोरेशनचे पहिले मेयॉर म्हणून श्री. बाबूराव सणस यांची निवड झाली. पूर्वी हे नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेले होतेच ! श्री. बापूसाहेब पारगे यांची डेप्युटी मेयर म्हणून निवड झाली !

### प्रश्न

(१) म्युनिसिपल निवडणुकांबद्दल काय मत बनलें आहे ?
(२) निवडणुकींत गोंधळ होऊं नये म्हणून काय करण्यांत येतें ?
(३) " पुण्याची गेली निवडणूक " यावर १५ ओळी लिहा.

---

## पाठ २३ वा

# कॉर्पोरेशनच्या सभा



दि बॉम्बे प्रॉव्हिन्शियल म्युनिसिपल कार्पोरेशन ॲक्ट १९४९ च्या अनुसार कॉर्पोरेशनचा कारभार करण्याची व चालविण्याची जबाबदारी खालील अधिकाऱ्यांवर सदर कायद्याच्या कलम ४ अन्वयें टाकण्यांत आली आली आहे:—

(१) कॉर्पोरेशन, (२) स्टँडिंग कमिटी, (३) म्युनिसिपल कमिशनर आणि कॉर्पोरेशननें ट्रॅन्स्पोर्ट सर्व्हिस सुरू केली असल्यास, (४) ट्रॅन्स्पोर्ट कमिटी, (५) ट्रॅन्स्पोर्ट मॅनेजर.

या सर्व अधिकाऱ्यांचें अधिकारक्षेत्र व कार्यक्षेत्र कायद्यानें निश्चित

केलें आहे. त्याप्रमाणें त्यांनीं आपापले कारभार करावयाचे असतात. या सर्व अधिकाऱ्यांच्या हक्कांची व कर्तव्यांची मर्यादा सांभाळून एकूण म्युनिसिपल कारभाराची जबाबदारी कॉर्पोरेशनवर टाकण्यांत आली आहे. ( कलम ६७—२ ) त्याचप्रमाणें कॉर्पोरेशनच्या कायद्यांत दिलेले आदेश व बंधनें सांभाळून सर्व सनदशीर बाबींची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी म्युनिसिपल कमिशनर यांच्यावर संपूर्णपणें सोंपविण्यांत आली आहे. ( कलम ६७—३ ).

**कॉर्पोरेशनः**—सर्वसाधारण निवडणुकीनंतर जी पहिली सभा होते त्या सभेची तारीख, वेळ आणि जागा ह्या गोष्टी म्युनिसिपल कमिशनर ठरवितात. या पहिल्याच सभेंत मेयॉर व डेप्युटी मेयॉर निवडण्यांत येतात. तसेंच स्टँडिंग कमिटी, ट्रॅन्स्पोर्ट कमिटी व इतर स्पेशल कमिटया यांची नेमणूक करण्याचीं कामें करण्यांत येतात. यानंतरच्या सभांचे दिनांक, वेळ व जागा मेयॉर निश्चित करतात.

**मासिक सभाः**—२० तारखेच्या आंत दर महिन्यास कमींत कमी एक साधारण सभा भरावयास पाहिजे. त्यासाठीं सात दिवसांची नोटीस पाहिजे.

**खास सभा**·—तांतडीच्या कामासाठीं मेयॉर अगर डेप्युटी मेयॉर यांना योग्य वाटेल तेव्हां कार्पोरेशनची खास सभा बोलावितां येईल. तसेंच कॉर्पोरेशनच्या सभासदांच्या एकूण संख्येपैकीं कमींत-कमी $\frac{1}{4}$ अगर स्टँडिंग कमिटीच्या कमींतकमी ४ सभासदांच्या सह्यांचें लेखी रिक्विझिशन आल्यास कॉर्पोरेशनची खास सभा बोलवावी लागेल. तीन दिवसांची नोटीस देणें आवश्यक. ही नोटीस म्युनिसिपल सेक्रेटरी सर्व सभासदांना देतील.

**कोरम:**—दर सभेस कमींतकमी $\frac{1}{6}$ सभासद हजर पाहिजेत. कॉर्पोरेशनच्या सभा कायद्याप्रमाणें व नियमाप्रमाणें चालविण्याची जबाबदारी मेयॉर यांचेवर आहे. सभेपुढें आलेले ठराव अगर उप-सूचना वाचून दाखविणें, व त्यांवर मतें घेणें, निकाल जाहीर करणें, पॉइंट ऑफ ऑर्डरचा निर्णय देणें वगैरे कामें मेयरनेंच करावयाचीं असतात.

**प्रश्न विचारणें:**—नियमांतील अटी व बंधनें पाळून कोणत्याही सभासदाला म्युनिसिपल कारभारासंबंधीं प्रश्न विचारतां येतील. त्याची कमींतकमी सात दिवसांची लेखी नोटीस म्युनिसिपल सेक्रेटरीस द्यावयास हवी. एका सभेंत पांचापेक्षां जास्त प्रश्न विचारावयाचे नाहींत. याला म्युनिसिपल कमिशनर लेखी उत्तर देतील. यांवर उपप्रश्न विचारतां येईल. 'मात्र नोटिशीशिवाय उत्तर देणें शक्य नाहीं.' असें म्यु. कमिशनर यांस सांगतां येईल.

**मेयॉर व डेप्युटी मेयॉर:**—सार्वजनिक निवडणुकीनंतर कॉर्पोरेशनची जी पहिली सभा भरेल त्या सभेंत मेयॉर आणि डेप्युटी मेयॉर यांची निवडणूक होईल. तसेंच पुढील वर्षाच्या त्याच महिन्यांत त्यांची पुन्हां निवडणूक करावी लागेल. माजी मेयॉर व डेप्युटी मेयॉर यांची फेरनिवडणूक करतां येईल.

**निवडणुकीची पद्धत:**—ज्या सभासदाला मेयॉर अगर डेप्युटी मेयॉर म्हणून निवडून येण्याची इच्छा असेल अशा सभासदाचें नांव कॉर्पोरेशननें निश्चित केलेल्या नॉमिनेशन पेपरच्या फॉर्मवर दुसऱ्या दोन सभासदांकडून सुचविलें गेलें पाहिजे व त्यास अनुमोदन दिलें

६

गेलें पाहिजे ! कोणत्याहि सभासदाला एकापेक्षां अधिक नांवें सुचवितां येणार नाहींत. एकापेक्षां अधिक उमेदवार उभे राहिल्यास त्यांची निवडणूक ठरलेल्या सभेंत गुप्त मतदान पद्धतीनें होईल.

**स्टँडिंग कमिटी**:—स्टँडिंग कमिटींत एकूण १२ सभासद. सार्वत्रिक निवडणुकीनंतर पहिल्या सभेंत स्टँडिंग कमिटीची निवडणूक होईल. पुढील वर्षी त्याच महिन्याच्या पहिल्या दिवशीं निम्मे सभासद रिटायर होतील व त्यांच्या जागीं नवीन निवडणूक होईल. कमिटीच्या सभासदाचें नांव इतर दोन सभासदांकडून सुचविलें गेलें पाहिजे व अनुमोदन पाहिजे.

कमिटीची सभा दर आठवडयास एक तरी भरेल. त्याशिवाय जादा सभा कोणत्याहि दिवशीं भरवितां येईल.

पहिल्या सभेची वेळ व दिवस म्युनिसिपल कमिशनर हे ठरवितील. या पहिल्या सभेंत चेअरमन यांची निवडणूक नॉमिनेशन व गुप्त मतदान पद्धतीनें होईल.

**ट्रॅन्स्पोर्ट कमिटी**:—सभासदांची संख्या एकूण नऊ. एक जागा स्टँडिंग कमिटीच्या चेअरमनसाठीं राखून ठेवण्यांत आली आहे. उरलेल्या आठ जागा कॉर्पोरेशननें भरावयाच्या असून त्यांवर कॉर्पोरेशन ॲक्टचें कलम २५ ( २ ) मध्यें तरतूद केल्याप्रमाणें सभासद अगर बिगर सभासद यांच्या नेमणुका करतां येतील.

१५ दिवसांतून एक सभा शिवाय खास सभा बोलावितां येईल. दोन वर्षांनीं निम्मे सभासद रिटायर होतील व त्यांच्या जागीं नव्या निवडणुका.

**स्पेशल कमिटया**:—खालील चार स्पेशल कमिटया नेमण्याची तरतूद आहे.

( १ ) पब्लिक वर्क्स कमिटी

( २ ) मेडिकल रिलीफ ॲन्ड पब्लिक हेल्थ कमिटी

( ३ ) लॉ, रेव्हेन्यू ॲन्ड जनरल परपझेस कमिटी

( ४ ) इम्प्रूव्हमेंट कमिटी

प्रत्येक समितीच्या सभासदांची संख्या नऊ. कोणत्याहि सभासदास दोनपेक्षां अधिक कमिटयांवर नेमतां येणार नाहीं. स्पेशल कमिटीची मुदत १ वर्ष.

**ॲडहॉक कमिटी**:—विशिष्ट कामासाठीं ॲडहॉक कमिटी नेमण्याचा अधिकार कार्पोरेशनला आहे ! अशा कमिटीकडे चौकशी, रिपोर्ट व अभिप्राय इत्यादि कामें सोपवितां येतात.

### प्रश्न

(१) टीपा लिहा:
मेयॉर व डेप्युटी मेयॉर.

(२) स्टँडिंग कमिटीची माहिती लिहा.

(३) स्पेशल कमिट्या कोणत्या ?

पाठ २४ वा

# विविध माहिती

( १ ) पुणें शहराची आरोग्यविषयक सर्वसाधारण कल्पना यावी म्हणून खालील नमुन्यादाखल एक तक्ता दिला आहे.

| | फेब्रुवारी १९५१ | फेब्रुवारी १९५२ |
|---|---|---|
| जन्म | १००२ | १०२६ |
| मृत्यु | ५१६ | ५५४ |
| उपजत मृत्यु | ५० | ५१ |
| एक वर्षा वयाचे आंत मृत्यु | १३३ | १७४ |
| क्षय | ४९ | ७९ |
| विषमज्वर | २ | ० |
| अतिसार | १८ | १६ |
| एन्फ्लुएन्झा व नवज्वर | ९२ | ७७ |
| देवी | ९ | १ |
| बाळंतपणामुळें मृत्यु | ९ | ० |
| अपघात, आत्महत्या | १२ | २४ |
| कॉलरा | ० | ० |

( २ ) सिनेमा, नाटक, तमाशा, सर्कस इत्यादि करमणुकीच्या प्रत्येक खेळास ५ रुपये म्युनिसिपल टॅक्स. कुस्ती कार्यक्रमास ५ रुपये कर पडतो. गाण्याच्या कार्यक्रमास १० रुपये कर पडतो.

बैलास वार्षिक १ रु. ८ आणे व घोड्यास वार्षिक ६ रुपये कर पडतो. रेसच्या घोडयास दरसाल १२ रुपये कर पडतो.

( ३ ) पुण्यानजीक लवकरच पेनिसिलीनचा औषधी कारखाना सुरू होईल. त्याचें उद्घाटन नामदार काकासाहेब गाडगीळ यांच्या हस्तें झालें. पेनिसिलिनचा भारतांतील हा पहिला कारखाना आहे. पेनिसिलिन हा रोगांवर एक रामबाण उपाय आहे.

( ४ ) **खडकवासला लष्करी शाळा**:—शाळेचें काम पुरें झालेलें आहे. दोन वर्षांपूर्वीं पंडित नेहरूंनीं उद्घाटन केलें. भारतांत प्रसिद्ध अशी लष्करी शाळा होईल !

( ५ ) **खडकवासलें येथील संशोधन केंद्र**:—खडकवासल्याला हें केंद्र असून निरनिराळ्या नद्यांवरील धरणें व योजना यांचे आराखडे बनविण्याचें येथें काम चालतें.

(६) **हिंदी केंद्र**:—पुण्याला राष्ट्रभाषेची सेवा करण्यासाठीं बरींच वर्षें प्रयत्न चालू आहेत. ठिकठिकाणीं विनामूल्य वर्ग चालतात. हजारों स्त्रीपुरुष दरवर्षीं परीक्षांना बसतात ! हिंदीच्या अभ्यासाची गोडी पुण्यांत दिवसेंदिवस वाढत आहे.

(७) **अतिक्रमण विभाग**:—म्युनिसिपल रस्त्यांमध्यें व हद्दींत लोकांचा विनाकारण पडलेला माल व वस्तु उचलून नेण्यासाठीं अतिक्रमण विभाग आहे. ह्यामुळें लोकांत एक प्रकारची शिस्त निर्माण होण्यास मदत होते व लोक आपल्या मालाविषयीं काळजी घेतात.

(८) **सायकली:**—सायकलींना सार्वजनिक ठिकाणीं कुलपें लावणें सक्तीचें केलें आहे. दरसाल दोन रुपये सायकल-कर भरावा लागतो व त्यासाठीं बिल्ला मिळतो तो सायकलला लावावा लागतो ! सायकलचे ब्रेक व घंटा उत्तम असावीं असा कटाक्ष आहे.

(९) **फुटपाथवरून चालणें:**—ज्या ठिकाणीं रस्ते रुंद केले आहेत व फुटपाथ आहेत अशा ठिकाणीं लोकांनीं फुटपाथवरूनच चाललें पाहिजे, नाहींतर दंडाची शिक्षा ठेवण्यांत आलेली आहे.

**प्रश्न**

(१) अतिक्रमण विभाग काय करतो ?
(२) "फूट पाथचे फायदे" यावर १० ओळी लिहा.
(३) 'करमणूक कर' कोणते आहेत ?
(४) खडकवासल्याचें महत्त्व कां वाढणार आहे ?

## पुरवणी पाठ २५ वा

## ( म. म. दत्तो वामन पोतदार यांचेकडून )

पुण्याजवळचे पाहण्याजोगे किल्ले किंवा स्थळें देतांना पुढील स्थळांचा निर्देश असणें अगत्याचें आहे. (१) बनेश्वर, (२) थेऊर, (३) खेड, (४) चांस, (५) चाकण, (६) पुरंदर, (७) लोहोगड-विसापूर, (८) कात्रज, (९) मुंढवें, (१०) कोंडणपूर, (११) भीमाशंकर इत्यादि.

तसेंच पुण्याच्या व आसपासच्या संस्थांत व प्रेक्षणीय स्थळांत पुढील नोंदी नसतील तर चालणार नाहीं. (१) लिमये आणि त्यांचें रसायन मंदिर, (२) ओगले स्मारक आणि मराठा चेंबर, (३) महाराष्ट्र आदि पेढ्या, (४) इब्री जमातीचें तांबडें देऊळ, (५) ख्रिस्ती देवळें, (६) घाशीरामाचें तळें, (७) नाना फडणीस वाडा, (८) मोरोबादादा वाडा, (९) फडकेवाडा-हौद, (१०) पुण्यांतील अनेक गायनवादन शाळा, (११) खडकी येथील अस्त्रागार, (१२) वेदशास्त्र शाळा, (१३) वैदिक संशोधन मंडळ, (१४) टिळकविद्यापीठ, (१५) चित्रशाळा, (१६) जुन्या तालमी व आखाडे, (१७) तळेगांवचा कांचकारखाना, आणि सरदेसाई यांचें रुग्णालय, (१८) लोणीची सुंदर प्रेक्षणीय गर्द सरळ वाट आणि मांजरी शेतकीशाळा व लोणी वेसिक अध्या-शाळा, (१९) दापोडी यंत्रालय, (२०) किर्लोस्कर कारखाना खडकी, (२१) पेन्सिल कारखाना खडकी, (२२) मातीच्या भांड्यांचा कारखाना चिंचवड, (२३) कागद कारखाना खोपोलीं, (२४) खोपोली वीज कार्यालय, (२५) हिऱ्यांचा

बोगदा बोरघाट, (२६) नाना फडणीस तळें खोपोली, (२७) बेडशाचीं लेणीं, (२८) डी नोबिली-कॉलेज-येरवडा, (२९) संतिपंत भागवतांचें विठ्ठल मंदिर-लकडीपूल, (३०) अनघडशाचा तकिया, भवानी पेठ, (३१) पिलाजीराव जाधव आणि रामेश्वरभट समाधि वाघोली. इ. इ. इ.

पृ. ६–**सदाशिव पेठ**–सोंगट्याच्या पटासारखे प्रशस्त चौक साधून या पेठेची सुंदर मांडणी केलेली आहे.

पृ. ११–**शनिवारवाडा**– I मूळ बाजीरावानें बांधला तो इतका मोठा नव्हता. II वाड्याला बुरुज **आठच** आहेत. एकोणीस नव्हेत. शनवार पेठेचें जुनें नांव **मुर्चुदाबाद**.

पृ. १२ **अंबरखाना**–आहे तेथेंच शिवछत्रपतीचा वाडा होता. म्हणूनच त्यावरील बागेस जिजामाता बाग नांव दिलें तें शोभण्यासारखेंच आहे.

पृ. १३ **सोमेश्वर**–आज दिसतो तो पहिला नारायणराव नातूंनीं बांधला; तरी पुढें व्यापारी मंडळींनीं वर्गणी करून बांधला तोच आपण पाहतों.

पृ. १४–**खुन्या मुरलीधर**–स्थापना इ. स. १७९१. **नरसोबा मंदिर**–किरकोळे आज कारकोळपुरा म्हणतात.

पृ. १५–भारत इतिहास संशोधक मंडळ.

पृ. १५–पर्वतीवर नानासाहेब पेशवे यांची समाधि नाहीं. वारले ती सहाणेच्या खोलीची जागा आहे. समाधि लकडी पुलाचे दक्षिणेस आहे.

पृ. १६–अग्रस्थानीं पहिला गणपति कसबा गणपती असतो.

6883

पृ १८–जमास्पजी–असा शब्द पाहिजे.

पृ. १२– I मोहिया ( ता. नव्हे ) बाद– II **नागेश्वर**–फार जुना–
**नागेश्वरी**–( आजची नागझरी–झालेली ) जुनी.

पृ. २१–मंदिर 'गांवांत' बांधण्यास हरकत निघाली होती.

पृ. २२–कांहीं काळीं **मंडई**–सांप्रतच्या मोरे मंगल कार्याशेजारीं भरत असे. मुख्य गोष्ट पुणें नवीन मंडईचा अद्वितीय आराखडा कै. वासुदेराव कानिटकर या प्रख्यात शिल्पज्ञाचा.

पृ. २३–नदी पैलतीरींचें गांव 'भांबवडे' 'आर्यभूषण'–नवी इमारत–पूर्वींचा किबे वाडा–आरसे महाल जळल्यावरची.

पृ. २४–चतु:शृंगीवरील 'राजकारण' असलें तर अलीकडचें, चाफेकर युगांतील असेल. **वेधशाळा** = सिमला हपीस = ऑब्झर्व्हेटरी.

पृ. २५–एका 'दगडांत'? एका प्रचंड खडकांत. पांडवांशी कांहीं संबंध नाहीं.

पृ. २६–**गारपीर**–गारांच्या तुकड्यांचा. **पुणें**–तळावर फार नवी धर्मशाळा भव्य आहे.

पृ. २८–**पर्णकुटी**–ठाकरसी बंगला.

पृ. ३०–**भुलेश्वर**–किल्ले दौलतमंगळ-यादवकालीन सुंदर देऊळ.

पृ. ३०–**कोथरूड**–पेशवे देऊळ, वाडा वगैरे.

पृ. ३१–**देहू**–तुकोबांची समाधि आहे. उत्सवाचा दिवस फाल्गुन वद्य बीज. मोरया गोसावी–मार्गशीर्ष वद्य ६ अशा तिथि उत्सवजत्रांच्यां जोडावयास पाहिजेत.



REFBK-0007883